
# शब्द रुची

४९


सप्टेंबर २०२४ । मूल्य १० रु. । पृष्ठे ३६


## 'कृष्णाकाठावरून' पुस्तकाचे प्रकाशन



सुरेश देशमुख, सुनील रोहोकले, जयश्री देशमुख, लेखक मोहन देशमुख, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, ज्येष्ठ पत्रकार–खासदार कुमार केतकर, माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई, अजमेरा ग्रुपचे चेअरमन रजनी अजमेरा आणि सुदेश हिंगलासपूरकर

## 'हा ध्यास जीवनाचा' पुस्तकाचे प्रकाशन



अल्पना लेले, श्रीरंग साठे, सुधीर जोगळेकर, सुहास बहुळकर, राज ठाकरे, रवी जाधव, सतीश कान्हेरे आणि सुदेश हिंगलासपूरकर

## पुस्तकप्रकाशने




**राजा जाधव यांचा जीवनप्रवास**
**दादर ते दादर**
दादासाहेब दापोलीकर




**प्रवरेचा दाता**
दादासाहेब रुपवते




**एकदा आपणच व्हावे मोर**
मोहन काळे



**बे दुणे पाच**
सारिका कुलकर्णी

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची ४१

सप्टेंबर २०२४, वर्ष बारावे
अंक पाचवा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
**shabdruchee24@gmail.com**
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**समीर कदम**

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee24@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी** / ५
कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शैक्षणिक गुणवत्ता

**संजीवनी खेर** / ८
भावनांचे नाजूक पदर उलगडणारी
तमिळ लेखिका शिवशंकरी

**किरण येले** / १२
मूलगामी विचार करणारा कवी कमलेश महाले

**शरद काळे** / १५
निसर्गाचा सतत विचार करायला हवा!

**डॉ. श्रीकांत परळकर** / १८
गुरुदत्त

**अबोली ठोसर** / २१
हॅपी बर्थ डे लतादीदी

**प्रकाशने वृत्तांत** / २४ ते २९

ग्रंथपरिचय / ग्रंथपाने
**डॉ. निर्मोही फडके चांगदेव काळे** / ३० ते ३४

**'शब्द रुची' मासिक मार्च २०२५ पासून बंद करत आहोत. त्यामुळे मनीऑर्डर अथवा ऑनलाइन कुठल्याही पद्धतीने वर्गणी पाठवू नये. स्वीकारली जाणार नाही.**

**– सुदेश हिंगलासपूरकर**
**विश्वस्त, संपादक**

# संपादकीय...

हा अंक हातात पडेल तोवर गणेशोत्सव झालेला असेल. उत्साहाचे उधाण सर्वत्र दिसणारा हा काळ. कोकणी चाकरमानी असोत की मोठे व्यावसायिक, गणपतीला, यात्राजत्रांना कोकणात जात नाहीत असे होत नाही. त्यामुळे तिथली परंपरा टिकली आहे. नवी पिढीही त्यात सहभागी होते आहे, हे विशेष. भलेही धार्मिक पगडा असेल, तेवढ्यापुरते का होईना, असे वेळोवेळी वेगवेगळ्या समारंभांच्या निमित्ताने, आपले सणउत्सव सुरू राहतील. त्यातून धार्मिक बंधन म्हणून बऱ्याच बाबी घडतात. श्रावण 'पाळणे' हा त्याचा एक भाग. त्यामुळे आपसूक आरोग्याचे उपचारही घडतात.

जे नियंत्रण श्रावण पाळण्यावेळी असते, ते अनेक बाबींत ठेवले तर बरेच प्रश्न सुटतील. प्लास्टिकच्या अतिरेकी वापरामुळे आज झालेली सोय उद्याची जीवघेणी सवय होत आहे, असे शास्त्रज्ञ सांगत आहेत. प्लास्टिकच्या पर्यावरणात मिसळण्याने ते गाईगुरे, प्राणीपक्षी व माशांच्याही पोटात जात आहे. हे मायक्रोप्लास्टिक मांसाहारातून आपल्या पोटात जाते, ज्याने कॅन्सरचा धोका वाढू लागला आहे. ग्रंथाली 'विज्ञानधारा' हे मासिक शरद काळे यांच्या संपादनात प्रसिद्ध करते. यातून पर्यावरण, प्रदूषण, ऊर्जा आदी विषयांवर रंजक शैलीतील उद्बोधक लेख आपल्याला वास्तवाची जाणीव करून देतात.

शरद काळे यांचा 'निसर्गाचा सतत विचार करायला हवा' हा या अंकातील लेख, आपल्याला तेच भान देतो.

अभिनेता, संवेदनशील दिग्दर्शक गुरुदत्त यांचे हे जनशताब्दी वर्ष. त्यांच्या आठवणी डॉ. श्रीकांत परळकर यांनी लिहिल्या आहेत. २८ सप्टेंबर हा लता मंगेशकर यांचा जन्मदिन. त्यांना जाऊन दोन वर्षे झाली, मात्र त्यांच्या जन्मदिनाला 'जयंती' म्हणायला मन तयार होत नाही, या भावनेतून अबोली ठोसर यांनी या स्वरसम्राज्ञीसह अनुभवलेल्या क्षणांची साठवण 'हॅप्पी बर्थ डे लतादीदी' या लेखातून व्यक्त केली आहे.

पुढील अंक ऑक्टोबर-नोव्हेंबर असा दिवाळी विशेषांक असेल. 'नाते जनातले-मनातले' हा त्याचा एक विभाग आहे. गेल्या काही वर्षांत जगण्याच्या प्रत्येक बाबीमध्ये नाती बदलत आहेत. त्यात भावना, आपुलकी, निष्ठा, बंधन उरले नाही का, याचा वेध विविध क्षेत्रांतील मान्यवर घेत आहेत.

दिवाळी अंक संच योजना याही वर्षी आयोजित केली आहे. मोठ्यांसह बाल-कुमारांच्या दिवाळी अंकांचे संच असतील. मर्यादित संचांमुळे आपला संच लवकरच नोंदवावा.

**– अरुण जोशी**



# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शैक्षणिक गुणवत्ता

डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी

अलेक्सा ॲपला कुत्र्यासारखे भुंकायला सांगून उत्तर प्रदेशमधील बस्ती गावातल्या तेरा वर्षे वयाच्या निकीता नावाच्या मुलीने स्वतःचा आणि स्वतःच्या लहान बहिणीचा, माकडांच्या हल्ल्यापासून कसा बचाव केला त्याचा सविस्तर वृतांत ६ एप्रिल २०२४च्या इकॉनॉमिक टाइम्समध्ये आला आहे. आय वॉच किंवा स्मार्ट वॉचच्या मदतीने संभाव्य हृदयरोगाच्या झटक्याचा अंदाज आल्याने वेळीच उपचार झाल्यामुळे व्यक्तीचे प्राण कसे वाचले, हेही आपल्या वाचनात आले असेल. आपल्या अवतीभोवती कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणारी अनेक उपकरणे, ॲप आहेत. सिरी, ॲलेक्सा, मेटा एआय, गुगल असिस्टंट, एल्सा, ग्रामर्ली, ड्युओलिन्गो, चॅट जीपीटी असे अनेक ॲप आपल्या परिचयाचे झालेले आहेत. ॲमॅझॉन, फ्लिपकार्ट, मिशोवरून ऑनलाइन वस्तू मागवणे प्रत्येकाला जमायला लागले आहे. विशेषतः कोव्हिडच्या साथीनंतर तर घरबसल्या मिळणाऱ्या या सर्व सेवा अत्यंत लोकप्रिय झाल्या आहेत. आपण एखादी वस्तू मागवली की लगेचच आपल्याला इतरांनी काय घेतले याच्या सूचना येतात व आपणही त्या वस्तू खरेदी कराव्या असा गर्भित सल्ला त्यासोबत असतो. पुस्तके ऑनलाइन मागवली की त्याच लेखकाची इतर पुस्तके, तसेच त्या विषयावरची इतर लेखकांची पुस्तके याची सूची आपल्याला पाठवली जाते. आपण जे जे ऑनलाइन शोधत असतो, 'सर्च' करतो, त्याची नोंद होत राहते व आपल्या सवयी, आवडी यांचा एक विदा संच (डेटा बेस) तयार होतो, ज्याचा व्यावसायिक वापर केला जातो. संगणकाच्या मदतीने केलेल्या ग्राहकाच्या स्वभावाचा, विचारांचा आणि वागणुकीचा अभ्यास, व संशोधन करून मांडलेल्या अंदाज, आडाख्यांवरून हे सर्व घडते. याला थोडक्यात कृत्रिम बुद्धिमता-आर्टिफीशीयल इंटेलिजन्स- एआय असे म्हटले जाते. आजच्या युगाचा मंत्रच मुळी एआय आणि बिग डेटा असा आहे.

युनिसेफने २०२१मध्ये कृत्रिम बुद्धिमता याची व्याख्या करताना म्हटले आहे, की- 'मशीन आधारित प्रणालींचा संदर्भ घेऊन मानव परिभाषित उद्दिष्टांचा संच दिल्यावर एआय अंदाज, शिफारशी, निर्णय देऊ शकते. एआय प्रणाली आपल्याशी संवाद साधतात आणि आपल्या भवतालावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम करतात. काही वेळा त्या स्वायत्तपणे कार्य करताना दिसतात, आणि संदर्भाचा अभ्यास करून त्यानुसार अनुकूल वर्तन करू शकतात.' कृत्रिम बुद्धिमत्ता ही संगणकाच्या माध्यमातू विविध प्रणालींच्या मदतीने मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण करू शकते. यामध्ये शिकणे, तर्क करणे, समस्या सोडवणे अशासारख्या क्रिया समाविष्ट आहेत. संगणकशास्त्रज्ञ जॉन मकार्थी यांनी १९५६ मध्ये पहिल्यांदा एआय ही संकल्पना डार्टमाऊथ समर रिसर्च कॉन्फरन्समध्ये वापरली. याच कॉन्फरन्समध्ये प्रथमच कृत्रिम बुद्धिमत्तेला विज्ञान म्हणून संबोधले गेले.

निर्जीव वस्तूंना स्वतःची बुद्धिमत्ता असते हा विचार प्राचीन काळापासून प्रचलित आहे. ग्रीकांचा देव, हेफेस्टस; पौराणिक कथांमधे त्याला सोन्यापासून रोबोसारखे सेवक बनवताना चित्रित केले आहे. तसेच प्राचीन इजिप्तमधील अभियंते, हलणाऱ्या देवांच्या मूर्ती बनवू शकत. पुजारी, या मूर्ती छुप्या यंत्रणेद्वारे संचलित करू शकत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासाचा आणि वापराचा इतिहास खूप मोठा आहे. प्राचीन काळातच याची बीजे रोवली गेली. मात्र आज ज्या स्वरूपात आपण एआय अनुभवतो आहोत त्याची सुरुवात संगणकाच्या विकासासोबत जोडली जाऊ शकते. संगणकाचा हा विकास घडत असताना त्याचा आपल्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणामही आपण अनुभवत आहोतच. एआयचा वापर वैद्यकशास्त्र, अर्थशास्त्र, वित्तव्यवस्था, कायद्याची अंमलबजावणी, व्यवसाय अशा सर्वच क्षेत्रांमधे झालेला आहे. जीवनातल्या इतर बाबींवर याचे परिणाम होत असताना शिक्षणावर ते झाल्यावाचून कसे राहतील? त्या बदलांचा वेग मात्र खूप कमी होता. मात्र २०२३मध्ये चॅट-जीपीटी आल्यावर एकच खळबळ उडाली. शिक्षणक्षेत्रात प्रचंड अस्वस्थता निर्माण

झाली कारण चॅट जीपीटीचा वापर करून विद्यार्थी अभ्यास न करता, कोणतेही आकलन न होता चटकन, प्रश्नांना, परीक्षेमध्ये, उत्तम उत्तरे लिहू शकतील अशी शक्यता निर्माण झाली. शिक्षकाची गरजच उरणार नाही अशी शक्यता वर्तवण्यात आली. आधीच कोव्हिडदरम्यान आणि त्यानंतरही औपचारिक शिक्षणाची गाडी रुळावरून घसरली असताना विद्यार्थ्यांना आयती उत्तरे मिळणार असतील तर शिक्षण होणारच कसे हा मूलभूत प्रश्न उपस्थित झाला.

शिक्षणाचे चार आयाम लक्षात घेतले तर ते आहेत-

ज्ञानप्राप्ती- आपल्याला काय माहीत आहे व त्याचे आकलन किती झाले आहे.

कौशल्यप्राप्ती- आपण काय करू शकतो आणि काय करतो.

चारित्र्यसंवर्धन- जगात कसे वागावे, मूल्याधिष्ठित जगणे कसे असावे.

मेटा लर्निंग- वैचारिक प्रगल्भता, प्रतिभासंपन्नता, आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता निर्माण करणे.

या चार आयामांची प्राप्ती म्हणजे शिक्षण असे गृहीत धरले तर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शिक्षणपद्धती हे कशा प्रकारे साध्य करू शकतील याचा विचार होणे गरजेचे आहे. संशोधनातून असे लक्षात आले आहे की पहिले दोन आयाम साध्य करणे शक्य आहे मात्र तिसऱ्या व चौथ्या आयामाच्या बाबतीत ते अद्याप तरी साध्य झालेले नाही. पूर्व-परिभाषित ज्ञानसामग्री संपादन करणे हे शिक्षणाचे एक कार्य आहे. त्याचप्रमाणे शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान व कौशल्ये निर्माण करून, त्यांची आकलनक्षमता वाढवण्याचे कार्य करणे अपेक्षित आहे - ज्या योगे ते विद्यार्थी आयुष्यात काहीतरी करू शकतील. तसेच शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितीचा भाग बनून त्याचा योग्य अंगीकार करण्याचे कौशल्य निर्माण होणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाने विद्यार्थ्याला वैचारिक, बौद्धिक आणि कृती करण्याची स्वायत्तता आणि स्वातंत्र्य मिळवून दिले पाहिजे.

शिक्षणामध्ये एआयचा वापर होणे आता अपरिहार्य असल्याने, वापराच्या पद्धती तसेच त्याचे फायदे आणि तोटे समजून घेणे अगत्याचे ठरेल. एआयचा वापर विद्यार्थी, शिक्षक,व्यवस्थापन यांच्या दृष्टीने भिन्न भिन्न असू शकतो. विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये न मिळणारे स्वातंत्र्य एआयच्या वापराने मिळवता येईल. त्यांना त्यांच्या पसंतीचे, त्यांच्या आवाक्यानुसार, त्यांच्या आकलनाच्या वेगानुसार, काळवेळाच्या बंधनात न अडकता शिक्षण घेण्याची मुभा मिळू शकते. एआयच्या वापराने शिक्षणात सर्वसमावेशकता तसेच जागतिक प्रवेशक्षमतेमध्ये वाढ करणे शक्य होईल. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक निकषांवर शिक्षण घेणे शक्य होईल. शिकणे आणि शिकवणे जास्त परिणामकारक होऊ शकेल. अमेरिकेतील बोल्टन कॉलेजच्या केस स्टडीनुसार १०००० विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी अवघ्या सात लोकांची गरज पडते. सर्व शिक्षण एआयच्या मदतीने तयार केलेल्या शैक्षणिक व्हिडीओच्या माध्यमातून दिले जाते. यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांची ८० टक्के वेळेची बचत होते असे अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. विद्यार्थी जेव्हा चार भिंतींच्या वर्गात शिकतो तेव्हा त्यातील फक्त १० टक्केच लक्षात ठेवू शकतो, मात्र व्हिडीओच्या माध्यमातून, शैक्षणिक खेळ, आभासी वास्तवाच्या मदतीने केलेले सिम्युलेशन यातून दिलेले शिक्षण ९५ टक्के लक्षात राहते.

अशाच सारखा एआय आधारित अभ्यासक्रम जर्मनीतील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ अॅप्लाइड सायन्सेसमध्ये देण्यात येतो. इथे १०,००० विद्यार्थ्यांना २८००० शैक्षणिक व्हिडिओच्या माध्यमातून शिक्षण देण्यात येते. साधारण २०० लोकांचा स्टाफ इतक्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा भागवू शकतो.

या पद्धतीत शिक्षकाचे स्थान धोक्यात येण्याची शक्यता बोलून दाखवली जाते, मात्र प्रत्यक्षात एआयच्या वापराचा उपयोग कल्पकतेने केल्यास शिक्षकाला एक सहकारी किंवा मदतनीस या स्वरूपात त्याची मदत होऊ शकते. शैक्षणिक साधनसामग्री तयार करण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकच लागणार. त्यामुळे शिक्षकाच्या कामाची पद्धत बदलेल, त्याची भूमिका आणि महत्त्व अबाधित राहील असे वाटते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेचा, आकलनाचा अंदाज शिक्षकाला एआयच्या मदतीने येत असल्याने वैयक्तिकरीत्या विद्यार्थ्यांच्या गरजा भागवणे शक्य होते. शिक्षक अंदाजे ३१ टक्के वेळ त्याच त्या गोष्टींवर म्हणजे हजेरी, पेपर तपासणे, मूल्यांकन करणे, प्लान तयार करणे, प्रशासनाची नित्य कामे, यावर व्यतीत करत असतात. या कंटाळवाण्या गोष्टी शिक्षकांना एआयच्या मदतीने करून घेता येतात आणि वाचलेला वेळ आणि श्रम अधिक सकस शैक्षणिक अनुभव निर्माण करण्यासाठी वापरणे शक्य होते.

एआयच्या माध्यमातून शिक्षण घेताना औपचारिक शिक्षण पद्धतीतले शिक्षकाचे स्थान आणि काम बदलते. विद्यार्थी केंद्री असलेल्या एआय पद्धतीमध्ये शिक्षकाची भूमिका ही फॅसिलिटेटर म्हणजे मदत करणारा-सुविधा पुरवणारा, अशा स्वरूपाची होते. विद्यार्थ्याला काय हवे आहे हे त्यानेच ठरवून त्यानुसार अभ्यासक्रमाची निवड करणे अपेक्षित आहे. याचा अर्थ असा की विद्यार्थी हा प्रगल्भ आणि सजग असला पाहिजे व आयुष्यात नेमके काय करायचे आहे व त्यासाठी लागणारे शैक्षणिक अनुभव कोणते, ते कुठे व कसे घ्यायचे याचे पूर्ण भान असायला हवे. या पद्धतीमध्ये विद्यार्थ्याची जबाबदारी कैक पट वाढते. एआय वापरल्याने शिक्षण प्रक्रियेत शिक्षकाद्वारे मिळणारा मानवी स्पर्श कमी होतो, परंतु इतर साधनाद्वारे दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक अनुभवाची गुणवत्ता वाढते. शिक्षणातील एआयच्या वापराची काही ठळक उदाहरणे म्हणजे खानमिगो, न्यूआंस,

स्टेपवाईज, कार्नेजी लर्निंग, ड्युओलिंगो इत्यादी.

एआयने काही आव्हाने ही आपल्यासमोर उभी केली आहेत. सुरुवातीच्या काळात तरी शिक्षणातील एआयचा वापर ही खूप खर्चीक बाब असल्याने सर्वांनाच परवडेल असे नाही. त्यामुळे शैक्षणिक विषमता वाढीला लागू शकते. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संगणककौशल्यांमध्ये वाढ होणे आवश्यक आहे. आपल्याकडे अखंड विजेचा पुरवठा, इंटरनेट अशासारख्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होणेही गरजेचे आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गोपनीयतेला धक्का पोहोचू शकतो. त्यामुळे माहितीची सुरक्षितता जपता न येणे हा महत्त्वाचा धोका संभवतो.

लहान मुलांत मोबाइलचे वाढते व्यसन हा चिंतेचा विषय बनला आहे. २०२३मध्ये युनेस्कोने शिक्षणातील तंत्रज्ञानावरील अहवाल प्रकाशित केला. या अहवालात असे सांगण्यात आले, की ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाइल उपकरणे आहेत, त्यांच्या शिकण्याच्या क्षमतेवर आणि लक्ष केंद्रित करण्याच्या क्षमतेवर नकारात्मक परिणाम होत आहे. अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने शिक्षण आणि शिकण्यात अनेक बदल झाले आहेत. किमान श्रीमंत देशांमध्ये, तरुणांनी शाळेतल्या शिकवण्यातून अपेक्षित असलेल्या मूलभूत कौशल्यांचा विस्तार झाला आहे. ज्यामध्ये डिजिटल जगात नेव्हिगेट कसे करावे हे कौशल्य महत्त्वाचे आहे. आंतरराष्ट्रीय मूल्यांकन डेटा, जसे की आंतरराष्ट्रीय विद्यार्थी मूल्यांकन कार्यक्रममधून (PIS) असे दिसून आले आहे की जास्त खउढ (माहिती संप्रेषण तंत्रज्ञान) वापरामुळे विद्यार्थ्यांच्या कामगिरीवर नकारात्मक परिणाम झाला आहे. कोरोनाच्या काळात स्मार्ट फोनचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. तेव्हा तो अपरिहार्य होता. अहवालात असेही म्हटले आहे, की विद्यार्थ्यांनी उपकरणाचा वापर विशिष्ट मर्यादेपलीकडे केल्याने शैक्षणिक कामगिरीवर परिणाम होतो. स्मार्टफोन आणि कम्प्युटरचा वापर वर्गात आणि घरात शिकण्याच्या प्रक्रियेत व्यत्यय आणतो.

विद्यार्थी आणि शिक्षक तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन त्याचा अतिरेकी वापर करू शकतात. यामुळे मानवाकडे असलेल्या नैसर्गिक, उपजत क्षमतांचा वापर न केल्याने त्यांचा ऱ्हास होऊ शकतो. वापर न केल्याने मानवाची शेपटी गळून पडली तशी अंगी उपजत असणारी कौशल्ये वापराविना गंजून जातील. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जॉर्ज बर्नाड शॉ या प्रसिद्ध नाटककाराने १९२८मध्ये The Intelligent Woman's Guide to Socialism and Capitalism या पुस्तकामध्ये अशा अधोगतीची भीती वर्तवली आहे. आपण यंत्रांवर कामे सोपवायला लागतो तसतसे आपल्या अंगभूत मानवी क्षमतांचा कसा ऱ्हास होतो ते एका पिनच्या उत्पादनाच्या उदाहरणावरून स्पष्ट केले आहे. पूर्वी पिना इतक्या महाग असायच्या की स्त्रियांना देण्यात येणाऱ्या पॉकेट मनी किंवा भत्त्याला 'पिन मनी' म्हणत. पूर्वी पिन तयार करणाऱ्या कारागिराला कच्चा माल घेणे, त्यावर प्रक्रिया करून पिन उत्पादन करणे व त्यानंतर त्या ग्राहकाला विकणे या तिन्ही कौशल्यांचा वापर करावा लागे. मात्र पिना कारखान्यात तयार व्हायला लागल्यावर या तीनही कला त्या व्यक्तीकडे असायलाच हव्या असे राहिले नाही, या तीन वेगवेगळ्या लोकांच्या माध्यमातून एकत्र करता येणे शक्य झाले. पिन तयार करण्याचे काम यंत्र करू लागल्यावर तर ते कसब लयालाच गेले. सांगायचा मुद्दा, हा की यंत्राद्वारे कामे करून घेताना माणसाला आराम मिळतो, वेळ वाचतो, पैसा साठतो, पण त्याच्याकडे असलेल्या कौशल्यांचा ऱ्हास होतो. म्हणून शॉने सिद्ध केले, की Wealth accumulates and men decay. त्यामुळे 'अती सर्वत्र वर्जेयेत'. १९ जुलै रोजी मायक्रोसॉफ्ट क्राऊड स्ट्राईकच्या घटनेनंतर जगभरातले सर्व महत्त्वाचे व्यवहार बंद पडले. आपण यंत्रांवर विशेषतः संगणकांवर किती अवलंबून आहोत व ते काम करायचे थांबले तर किती हतबल होतो याचा आपण नुकताच अनुभव घेतला आहे.

कोळशाच्या शेगडीचा धूर घातक आहे म्हणून धूर कमी करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा कोळशाच्या शेगडीला पर्याय शोधणे महत्त्वाचे. म्हणूनच शिक्षणप्रक्रिया जास्त परिणामकारक आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी एआयचा वापर करणे महत्त्वाचे आहे पण तो वापर हा योग्य पद्धतीने, नैतिकतेच्या मर्यादा पाळून झाला पाहिजे.

प्रसिद्ध विज्ञान कथालेखक आयझॅक ॲसिमॉव्ह यांचा I, Robot (२००४) हा लघुकथा संग्रह आणि त्यावर आधारलेला चित्रपट यामध्ये रोबो म्हणजे यंत्रमानवांनी पाळायचे तीन नियम नमूद केले आहेत. पहिला नियम- रोबो एखाद्या माणसाला इजा करू शकत नाही किंवा निष्क्रियतेमुळे माणसाला हानी पोहोचवू शकत नाही. मानवजातीला धोका निर्माण होत असेल तरच रोबोटने हस्तक्षेप करावा. दुसरा नियम- रोबोने मानवाने दिलेल्या आदेशांचे पालन करणे आवश्यक आहे. पहिल्या नियमांच्या विरोधात कोणाचे आदेश असतील तर रोबोने ते पाळू नयेत. तिसरा नियम- पहिल्या आणि दुसऱ्या नियमांच्या विरोधात न जाता व मानवजातीला धोका उत्पन्न न होता रोबोला स्वसंरक्षणाचा अधिकार आहे. या सारखेच आपल्यालाही एआयच्या वापरासंबंधी सुस्पष्ट धोरण, कायदे, आचारसंहिता, नियमावली तयार केली पाहिजे व त्याचे काटेकोर पालन झाले पाहिजे.

थोडक्यात, सर्वच बाबींमधे एआयचा वापर हा विचारपूर्वक व प्रमाणात केला पाहिजे असाच बोध या घटना आणि उदाहरणांवरून घेता येईल.

**- डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी**
anjali.ptwrdhn@gmail.com



# भावनांचे नाजूक पदर उलगडणारी
# तमिळ लेखिका शिवशंकरी

संजीवनी खेर

आपल्या ग्लोकल लेखिकांमध्ये जेव्हा आपण विविध प्रांतांतील लेखिकांचे साहित्य वाचतो तेव्हा आपल्याला जाणवते की एक देश असूनसुद्धा आपल्यात किती वेगळेपण आहे. वेशभूषा, वागण्यात, संस्कारात, चालीरीतीत भिन्नता असली तरी आपण एक आहोत. आज आपण एका तामिळ साहित्यिकेचा आणि तिच्या साहित्याचा परिचय करून घेणार आहोत. तिच्या लेखनाचा आणि इतर कामाचा आवाका पाहिला की आपण चकित झाल्याशिवाय राहणार नाही. सृजनात्मक लेखन, सामाजिक जाणिवेने लेखन, काव्य-कादंबरी, इतर भाषक लेखकांनी त्या त्या भाषेला दिलेले योगदान याचे चिकित्सक ग्रंथसंग्रह, देशातील अठरा भाषांतील साहित्य आणि साहित्यिकांच्या मुलाखती तसेच त्यांच्या लेखनाचे दस्तऐवजी करणाचे अनेक ग्रंथ तिने सिद्ध केले आहेत. 'निट इंडिया इन लिटरेचर' ह्या प्रकल्पात खोलवर अभ्यास करून लेखक/लेखिकांच्या मुलाखती घेऊन, महत्त्वाच्या साहित्याचा अनुवाद करून, करवून घेऊन हे बृहद ग्रंथ तिने तयार केले आहेत.

तमिळ भाषेतील अत्यंत महत्त्वाची साहित्यिक समजल्या जाणाऱ्या शिवशंकरीचा जन्म १४ ऑक्टोबर १९४२ रोजी चेन्नईला झाला. एका सुसंस्कृत उच्चवर्णीय परिवारात तिला सर्व सोयी आणि सवलती मिळाल्या. लहानपणची एक आठवण मोठी गोड आहे. वडिलांची ती लाडकी. दोन मोठे भाऊ आणि बहीण ही सर्वात धाकटी. तिला जोबू म्हणत. तिने आपल्या 'सूर्यवंशम' ह्या दीर्घ आत्मकथेत अनेक सुंदर व कष्टकारक आठवणी लिहिल्या आहेत. त्यांचे घर एक सधन ब्राह्मण कुटुंबाचे होते. वडील सूर्यनारायण आणि आई राजलक्ष्मी दोघेही सुधारकी विचारांचे होते त्यामुळे लहानपणी सर्व मुलामुलींनाही पोहायचे शिक्षण मिळाले. समुद्रावरही ते सर्व जण पोहायला जात असत.

एकदा काही कामाने वडील मित्राच्या जंगलातील घरी चालले होते. बहुतेक वेळा ते आपल्या लाडक्या लेकीला



शिवशंकरी

मांडीवर बसवून ड्राइव्ह करत. परंतु लेकीची शाळा बुडू नये म्हणून ते एकटेच चालले होते. ती निजलेली होती. तिला हळूच विचारले, 'जिबू, तुझ्यासाठी काय आणू?' हिने भोळेपणाने म्हटले, 'आप्पा माझ्यासाठी एक हरीण आणा.'

दुसरे दिवशी ती झोपलेली असताना काही तरी ओले ओले तिच्या गालाला लागत होते. तिने उठून पाहिले तर एक छोटेसे हरणाचे पाडस तिच्या गालाला हुंगत होते. तिने आनंद नि आश्चर्याने त्याला गोंजारले. आप्पांनी खरेच तिच्यासाठी हरणाचे पिल्लू आणले होते. ती आनंदाने नाचू लागली. ही अनोखी भेट ती कधीच विसरू शकली नाही.


जुन्या पद्धतीचे, पारंपरिक प्रथासंस्कार असलेले घर असलं, तरी मुली खूप शिकल्या. तसे घरातले सर्वच उच्चशिक्षित, उच्चपदस्थ होते त्यामुळे मुलीनाही ती ओढ होती. शिवशंकरीने प्राणिशास्त्रात पदव्युत्तर पदवी पहिल्या


क्रमांकाने मिळवली. भरतनाट्यम नृत्यात ती पारंगत झाली. तसेच दाक्षिणात्य शास्त्रीय संगीतातही तिने प्रावीण्य मिळवलं. ते इतके की देशविदेशात मोठमोठ्या प्रतिष्ठित व्यासपीठांवर तिचे नृत्यगायनाचे कार्यक्रम होत असत.

तिला इतके सुस्थित सधन घर मिळाले आणि तिने त्याचे सोने केले. साहित्य आणि समाजकारण ह्यात तिला रुची होती. त्यामुळे तिने जे जे पाहिले, अनुभवले, मनाला टोचले ते आपल्यापरीने बदलायचा प्रयत्न तिने नेहमीच केला. अगदी तिच्या कादंबरीचे उदाहरण आहे. 'The trap to nowhere' यात तिने ड्रगच्या विळख्यात अडकलेल्या व्यसनाधीन तरुणांचे प्रश्न मांडले. त्यावर फक्त लिहून ती थांबली नाही, चेन्नईतील हॉस्पिटलमध्ये राजाजी सेंटर सुरू करून तिथे ह्या लोकांच्या व्यसनमुक्तीसाठी तिने प्रयत्न केले. तिने सामाजिक कामात रस घेतला पण साहित्याची निर्मितीही भरपूर केली. तिच्या ३५ कादंबऱ्या, १५० लघुकथा, ५ प्रवासवर्णने, ७ निबंधसंग्रह, २ कथाकारांच्या ग्रंथांचे चिकित्सक संग्रह प्रकाशित आहेत. ह्याखेरीज तिने एक बृहद प्रकल्प केला. ज्यात तिने देशांतील १८ भाषांमधील महत्त्वाच्या लेखकांच्या मुलाखती, त्यांच्या साहित्याचे महत्त्व मांडले. असे तिने चार खंड तयार केले आहेत. हे प्रचंड मोठे काम संशोधन, शोध, अभ्यास, प्रवास, भेटीगाठी, त्या त्या भाषेतील त्या त्या साहित्याचे स्थान अधोरेखित करून पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण भारतातील संस्कृती, रीतिरिवाज कळावेत म्हणून 'निट इंडिया थ्रू लिटरेचर' हा प्रकल्प १६ वर्षांच्या अथक प्रयत्नाने साकार झाला आहे. हा तमिळ आणि इंग्रजीत लिहिला गेला आहे. त्यामुळे त्याचे संदर्भमूल्य जास्त आहे.

तिचा विवाह श्री. चंद्रशेखरन यांच्याशी १९६३मध्ये झाला. त्यांनी डबल इंजिनीयरिंग केले होते. अत्यंत सुसंस्कृत व्यक्ती होते. त्यांनी तिला प्रोत्साहन दिले. त्यांना मूलबाळ नव्हते. ४८व्या वर्षी या सहजीवनाचा शेवट झाला. या त्यांच्या विरहानंतर ती पार कोलमडून गेली होती. आईने धीर देत समजावले की यापुढचे जीवन समाजासाठी वेच, लिही. शिक्षणानंतर तिने सिटी बँकेत पब्लिक रिलेशन्स ऑफिसर म्हणून काम केले. मागच्या लेखात एका अत्यंत दुर्दैवी साहित्यिका -अजित कौरबद्दल लिहिले होते. वाचणारा तिच्या अवस्थेने व्याकूळ होतो, इथे अगदी उलट आहे. ह्या साहित्यिकेला सर्व प्रकारे अनुकूल वातावरण मिळाले. सांसारिक सुख मिळाले, तिच्या लेखनाचे सर्वदूर कौतुक झाले, मानसन्मान मिळाले आजही ती समाधानी आयुष्य चेन्नई इथे व्यतीत करत आहे.

तिला तिच्या लेखनासाठी अगणित पुरस्कार मिळाले आहेत. लाइफ टाइम आचीव्हमेंट, कस्तुरी श्रीनिवास पुरस्कार, सर अन्नामलाई चेट्टीयार अॅवॉर्ड इंटरनॅशनल विमेन असोसिएशनचा वुमन ऑफ द इअर, १९९९, भारतीय भाषा




परिषद, तामि अन्नई अवॉर्ड, प्रेमचंद राष्ट्रीय साहित्य सन्मान, भारती अवॉर्ड तामिळनाडू सरकारचा पुरस्कार, गोपीचंद लिटररी अॅवॉर्ड, अमेरिकन लायब्ररी ऑफ कॉंग्रेसमध्ये दक्षिण आशियायी देशातील सहा लेखकांचे आवाज, त्यांच्याच साहित्यातील काही अंशाचे वाचन करून ते रेकॉर्ड करून सिंगापूर वाचनालयात सांभाळून ठेवले आहे, त्यातील एक आवाज आहे शिवशंकरीचा! चोघम ह्या कॉमन वेल्थ देशांच्या मीटिंगला ती राजीव गांधी यांच्याबरोबर दोनदा गेली होती. त्या प्रवासाच्या वर्णनाचे पुस्तक तिने लिहिले आहे. याखेरीज तिने इंदिराजींचे आणि जीडी नायडूंचे चरित्र लिहिले आहे. तिच्या लेखनाचे युक्रेनियन, जपानी आणि अर्थात इंग्रजीत अनुवाद झाले आहेत.

तिच्या सहा कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत. मुलांसाठी कित्येक ऑडिओ बुक तिने केली आहेत. तिची आत्मकथा 'सूर्यवंशम' आजही तमिळ वाचकांत प्रचंड लोकप्रिय आहे. तिला तिच्या वयाच्या दीड वर्षापासूनच्या घटना आठवतात. जुन्या एकत्र कुटुंबातील विकेशा नातेवाईक स्त्रिया त्यांचे दृढ वागणे, आईवडलांच्या जीवनातील अनेक अद्भुत वाटाव्या अशा हकिगती, तेव्हाच्या अजब चालीरीती, जीवन संघर्ष ती ह्या कथात्मक आत्मकहाणीत मांडते. साहित्यातील कहाण्या तिच्या मते ह्या त्याकाळातील सामाजिक, कौटुंबिक घटनांचा प्रातिनिधिक आरसाच आहेत. आणि आजच्या आणि उद्याच्या पिढीला हे समजणे अत्यावश्यक आहे. भूतकाळाच्या चौकटीवरच वर्तमान नि भविष्यकाळ उभा असतो.

तिच्या 'ब्रिजेस' ह्या कादंबरीतही तिने कट्टर ब्राह्मण कुटुंबातील तीन पिढ्यांचा इतिहास मांडला आहे. विसाव्या शतकातील स्त्रियांचे वागणे, कर्तव्य, परंपरा, कुटुंबाप्रती निष्ठा ती दर्शवते. प्रत्येक पिढीगणीक बदलणाऱ्या सामर्थ्यशील स्त्रिया दाखवताना तिचे सूक्ष्म निरीक्षण चकित करते. तिची 'डिसेप्शन' ही कथा साध्या रुटीन आयुष्य जगणाऱ्या गृहिणीचे दर्शन घडवते. भावनिक, आर्थिक आणि कौटुंबिक दृष्ट्या

ती पतीवर अवलंबून असते. तशी असहाय्य वाटते पण ती स्त्रीदेखील पतीने फसवणूक केल्यावर पेटून उठते आणि मुलांना घेऊन स्वतंत्र्य बाण्याने जगायचे ठरवते. तिची फसवणूक होताना बघणे हा वाचकाला अस्वस्थ करणारा अनुभव असतो. कारण जी गृहिणी पूर्णपणे पतीच्या प्रेमावर विश्वास ठेवते, अगोदर तोदेखील तिला सोडून कंपनीच्या कामासाठी विदेशात जायला तयार नसतो तेव्हाचे त्याचे वागणे खरे तर प्रामाणिक असते. ती त्याच्या प्रगतीसाठी, प्रमोशनसाठी त्याला बाहेर जायला भाग पाडते; तोच माणूस विदेशात जाऊन इतका परका होऊ शकतो? त्याला गोऱ्या परस्त्रीच्या बाहुपाशात पाहणे तिला असह्य होते. तिच्या हातात आजवर पती वरचा विश्वास, घर आणि मुले एवढे संचित असते, बाहेरचे जग तसे तिला परके असते. पण पतीने केलेल्या प्रतारणेनंतर ह्या साऱ्या बाबी तिला निरर्थक वाटू लागतात. एका तरुण स्त्रीच्या हाती अर्थार्जनाचे साधन नसल्याने ती किती हतबल होऊ शकते याचे प्रभावी चित्रण तिने ह्या कादंबरीत केले आहे. त्यातून ती किती जिद्दीने उभी राहते हे दाखवले आहे. या कथानकातून ती वाचकांना संदेश देते की स्त्रीने आपल्या पायावर उभे राहणे अत्यावश्यक आहे. ती घरच्यांच्या दयेवर असता कामा नये.

तिच्या सहा कथांवर चित्रपट झाले. त्यातील एक आहे, बालमजूर असलेल्या मुलीच्या आयुष्यावरील 'कुट्टी' या कथेवरचा. हा चित्रपट जानकी विश्वनाथन हिने दिग्दर्शित केला होता. या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळला होता. तिच्या कथा आणि कादंबऱ्यावर टीव्ही मालिका झाल्या. त्याना राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले. लोकप्रिय 'बेस्ट मेगा' मालिका म्हणून गौरवल्या गेल्या.

'सूर्यवंशम' ही तिच्या जीवनाचा आरसा ठरलेली साहित्यकृती. मुळात तिला आपल्या घराण्याबद्दल लिहायला संकोच वाटत होता. पण, तिची जिवलग मैत्रीण ललिता तिच्या मागे सारखी लागली होती की तिने आपल्या प्रतिष्ठित आणि सुसंस्कृत घराबद्दल, त्यांच्या आयुष्यात घडलेल्या अनेक घटनांबद्दल लिहावे, हा आपल्या सामाजिक जीवनाचा इतिहास आहे जो आजच्या पिढीला ठाऊक नाही. तो काळाच्या ओघात लुप्त होऊन जाईल. परंतु तिने फारसे मनावर घेतले नाही. ललिताच्या आकस्मित निधनाने तिला चुटपूट लागून राहिली की आता तरी हे काम व्हायला हवे. अशा वेळी एक संपादक मैत्रीण पुढे आली. तिने शिवशंकरीला सांगितले, 'तुम्ही हे आत्मचरित्रवजा आठवणींचे संचित मला सांगत जा. मी ते रेकॉर्ड करून घेते आणि मग ते टाइप करते.'

तिची तब्येत तोळामासा होत होती, तरी तिने जिद्दीने ते पुस्तक पुरे केले. ते आता अजरामर झाले आहे. जे तिने आपल्या मैत्रीणीला अर्पण केले आहे. चेन्नई ह्या शहरातील बदल, लोकांमधील बदल खरोखरच नोंद करून ठेवावे असे होते. तिची स्मरणशक्ती तीक्ष्ण असल्याने खूप घटना तिला काल घडल्यागत आठवत होत्या. एक घटना ती नोंदवते जेव्हा ऑल इंडिया काँग्रेसचे अधिवेशन चेन्नईला होते. तेव्हा तेथील स्वयंसेवकांना जेवण द्यायचे आप्पांनी ठरवले. घरातील सगळे नोकरचाकर तर कामाला लागलेच, घरातील मुलेबाळेदेखील जोमाने सांबार-भाताचे पुडके तयार करून देऊन ह्या धर्मार्थ कामात सहभागी झाली. आपल्या वागण्यातून सेवेची दीक्षा मुलांना मिळत गेली. आपण समाजाचे देणे लागतो हे दर्शवण्याचा हा सोपा वाटणारा मार्ग आप्पांनी स्वीकारला होता.

हे तिने सहजपणे नोंदवले आहे. वास्तविक ती म्हणते की तिला वयाच्या दीड वर्षांपासूनचे सारे आठवत आहे. त्यांच्या घराण्याचा तीनशे वर्षांचा इतिहासाचा खजिना सर्वांसाठी खुला झाला. जे तिला ठाऊक नव्हते ते घरच्यांशी, नातेवाईकांशी बोलून तिने शब्दबद्ध केले. आईवडीलांचे लग्न झाले तेव्हा आई १४ वर्षांची तर वडील २५चे होते. शिक्षणात हे घर अग्रेसर होते. वडिलांची स्वत:ची फर्म होती. यशस्वी ऑडिट करणारी कंपनी म्हणून अगदी मलेशियापर्यंत कीर्ती पसरलेली होती. त्यांच्या घरच्यांची ऊठबस चेन्नईतील प्रतिष्ठित लोकांत होती. राजकारण, समाजकारण, अर्थकारण सर्वच क्षेत्रांतील लोक त्यांच्या घरी नेहमी येत असत. लहानपणापासून लेखिकेची सर्वांशी जानपहचान होती. काहींच्या तर अंगाखांद्यावर ती खेळली होती. त्यांच्या घरी येणे जाणे होते. एकच उदाहरण मी देते, टी टी कृष्णम्माचारीना ती मामाच म्हणत असे.

विवाहानंतर एकदा ती तिचे पती चंद्रशेखर यांच्या बदलीच्या गावी, भोपाळला राहत होती. त्यावेळी अर्थमंत्री कृष्णम्माचारी भेल ह्या कारखान्याला भेट द्यायला आले होते. त्या दरम्यान त्यांनी तेथील वरिष्ठांना सांगितले की माझ्या भाचीचा नवरा चंद्रशेखर इथे इंजिनियर म्हणून काम करतोय त्याला नि माझ्या भाचीला दुपारच्या जेवणाला बोलावून घ्या. आता दहा हजार अधिकाऱ्यांतून अर्थमंत्र्याचा जावई कसा शोधणार? पण काय मंत्र्यांनी सांगितले म्हणजे शोधले पाहिजे! अखेर चेन्नईच्या चंद्रशेखर आणि शिवशंकरीला गाडी पाठवून बोलावून घेतले गेले. आपल्या शेजारी बसवून ते कौतुकाने म्हणाले, 'हिच्या वडिलांशी आमचे खूप जुने कौटुंबिक संबंध आहेत. बालपणी हिला मी अंगखांद्यावर खेळवत असे. आता लेखिका झालीय.'

आपल्याकडे जसे मंगळागौरी वा गौरीगणपतीच्या दिवसांत एकमेकांकडे जाण्याचा प्रघात आहे तसंच तमिळ लोकांत नवरात्रीत एकमेकांकडे जाण्याचा प्रधात आहे. पण, तिथे फक्त स्त्रिया - खास करून सवाष्ण - सुमंगळी- आणि कुमारिकांना आमंत्रण असते. घरात बाहुल्यांची आरास-कोलु- असते. मुली गाणी म्हणतात. संध्याकाळी हळदीकुंकू आणि पानसुपारीने

बोळवण करतात. लेखिका आपल्या आईचे वर्णन करताना म्हणते, 'ती म्हणजे रवीवर्म्याच्या चित्रातली नायिका असावी अशी रेखीव होती. हस्तिदंतासारखा नितळ गोरा रंग होता. लांबसडक केसांचा मोठा अंबाडा मानेवर रुळत असे. नऊवारी साडीत ती खूपच आकर्षक दिसे.'


आईच्या माहेरचे म्हणजेच तिच्या आजोळचे लोकही खूप नामांकित होते. जवाहरलाल नेहरू घराण्याशी खूप जवळचे संबंध होते. सुब्बलक्ष्मी आईची मामी होती. अनेकदा त्यांचे गाणे तिच्या घरी होत असे. त्यात अनेक नामीगिरामी लोक येत असत. आईची मावशी शिवागामी ही हजरजबाबी कवियत्री होती. ती आकाशवाणीची ए ग्रेड कलाकार होती. अनेकदा हे सगळे एकत्र येऊन घरी 'नलदमयंती' हे नाटक करत असत. लेखिकेची मोठी बहीण अत्यंत देखणी आहे. अत्यंत हुशार आहे. अर्थशास्त्रात तिने एमए केलेय सुवर्णपदकासह. तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग कधी कधी चर्चेला बोलावून घेत असत. मोठा भाऊ बायोटेक्नॉलॉजीमधील तज्ज्ञ असून राजीव गांधींच्या सायन्स मिशनचा प्रमुख होता. दुसरा भाऊ अमेरिकेत स्थित असून एका मोठ्या कंपनीचा भागीदार आहे. बंगळुरूला हे कुटुंब एका आलिशान बंगल्यात राहत होते. शेजारी पाजारी राजकीय वर्तुळातील मान्यवर होते. समोरचाच बंगला तत्कालीन मुख्यमंत्री कामराज यांचा होता. अशा वातावरणात शिवशंकरीचे बालपण गेले.

हे सारे छान छान लिहीत असताना ती बालपणाची एक भयंकर घटनाही नोंदवते. तो काळ, आपल्यावर ओढवलेला त्यातला प्रसंग नमूद करायचे धैर्य ती दाखवते. त्यांच्या त्या मोठ्या कुटुंबात अनेक नोकरचाकर होते. सर्वांचा विशेषत: मुलांचा आवडता एक स्वयपाकी होता. त्याच्या हातचे जेवण सर्वांनाच पसंत होते. खास करून मुलांच्या आवडीचे पदार्थ तो करून बच्चेकंपनीला खुश करायचा. रोज रात्री सगळ्यांना अंथरुणांत निजवून तो कधी गोष्टीही सांगायचा. पण, त्याच बरोबर तिला अस्वस्थ वाटेल असे स्पर्श करायचा आणि त्याच्या शरीरालादेखील स्पर्श करायला लावायचा. तिने कुठे बोभाटा करू नये म्हणून सज्जड दम द्यायचा, की घरातल्या मोठ्यांना काही सांगितलेत तर अन्नात विष घालून सगळ्यांना मारून टाकीन. साहजिकच तोंडाला कुलूप असे. पुढे काही दिवसांतच देवघरातील चांदीच्या वस्तू चोरताना पकडला गेला आणि त्याची हकालपट्टी झाली. ह्या घटनेबाबत इतर मुलींशी बोलल्यावर तिच्या लक्षात आले की असे प्रकार अनेकींच्या बाबत होत असतात. त्यांनी परस्परांच्या गळ्यात पडून मनसोक्त रडून घेतले. तिने आपल्या लेखनात ह्या साऱ्या घटनांवर परखडपणे लिहिले. समाजातील अनुचित गोष्टींचा पर्दाफाश लेखनात तिने केला आहे.

तिच्या अविश्रांत कामाने तिचे नाव तमिळ, इंग्रजी साहित्यात प्रतिष्ठेचे ठरले आहे. सामाजिक काम, साहित्यिक काम, मुलांसाठी केलेली बोलकी पुस्तके यामुळे आजही गाजत असते. तिने तमिळ लोकांच्या स्थलांतरितांवर लिहिलेली कादंबरी आज तमिळ नव्हे तर सर्वच स्थलांतरितांच्या, मानसिक, सांस्कृतिक, राहणीमानासंबंधी असलेल्या द्विधा मन:स्थितीचे दर्शन 'पोर्टेबल रुटस' घडवते. परंपरा आणि आधुनिकता यांचा हा सनातन संघर्ष आपल्याही जाणवत असतो. त्यातून मार्ग निघणे अवघड आहे याची जाणीव होत राहते. आपल्याभोवती घडणाऱ्या गोष्टीच लेखिका आपल्यासमोर मांडते, विचार करायला भाग पडते. हेच साहित्याचे सामर्थ्य नाही का?

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com


॥ग्रंथाली॥




# शेर काही अनुभवावे


गजलकार
**सदानंद डबीर**

संकलन
**शेखर जोशी**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

# पुरोगामी शाहू महाराज

**डॉ. शांताराम डफळ**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**



# मूलगामी विचार करणारा कवी कमलेश महाले

किरण येले

ज्या कवीने अजून कवितेच्या प्रांतात संग्रहरूपात पाऊलही टाकलेले नसते त्या कवीची मते सहसा कुणाला न दुखावणारी असतात किंवा सगळ्यांनाच चांगले म्हणणारी असतात. पण, नंदूरबार भागात राहणारा एक नवा कवी म्हणतो, 'इथे माणिबेली भागात अजून अंगवर चिंध्या घेऊन जगणारी माणसे आहेत, नर्मदा आंदोलनात ज्यांचे पुनर्वसन झाले नाही, ती माणसे असताना, तुम्ही कुठे चंद्रावर जाण्याच्या आणि ग्लोबलायझेशनच्या कविता लिहिता, वातानूकुलित खोलीत बसूनच फक्त हे शक्य आहे.' इतकी थेट मते कुठून येतात, यासाठी बोलल्यावर कळते, की या कवीने हिंदीतील, मराठीतील अनेक कवी वाचले आहेत. हिंदीतील नामवर सिंह, केदारनाथ सिंह, जेसिंथा केरकेट्टा, बाबूशा कोहली, तर मराठीतील अरुण कोलटकर, अरुण काळे, भुजंग मेश्राम, हे त्याचे आवडते कवी आहेत. भालचंद्र नेमाडे यांच्या लेखणीचा त्याच्यावर विशेष प्रभाव असल्याचे तो मान्य करतो. हा कवी पुढे म्हणतो, की आजही अरुण कोलटकर यांच्यानंतर आपल्याला दुसरे नाव सुचत नाही हे आपले दुर्दैव आहे. आपण नवतेची भाषा करतो पण मग नवतेमधील एकही कवी लोकांना का आपलासा वाटला नाही, अशी टीका करणारा हा कवी स्वत:वरही टीका करताना म्हणतो, की माझ्या कविता चांगल्या आहेत असे म्हणतात लोक, पण मला वाटतं मला जे लिहायचं आहे ते मी अजून लिहिलेलं नाही. दिनकर मनवर यांच्यासारखा स्वत:चे उत्खनन करणाऱ्या कवीच्या एका आदिवासी कवितेवर जो गदारोळ झाला, त्यामुळे मी हादरून गेलो आणि त्यातून अजून मला कवितेचा नेमका आवाज कागदावर उतरवताना भीती वाटते.

खरे तर इतका मूलगामी विचार करणारा नव्या पिढीचा एक कवी, कविता लिहिताना, तो लिहितो आहे ते फक्त ८० टक्के आहे, हे मान्य करत असेल, तर मराठी साहित्यासाठी आणि भारतीय समाजाच्या स्वास्थ्यासाठी ही धोक्याची घंटा



कमलेश राजेंद्र महाले

आहे असे मला वाटते. अशा अनेक कवींचे खच्चीकरण वा अशा कवींच्या मानसिक खुनाची सुई दिनकर मनवर यांच्या त्या कवितेविरोधात आंदोलन करणाऱ्यांकडे जाते, याविषयी माझ्या मनातही दुमत नाही.

या निडर आणि थेट विचारांच्या नव्या कवीचे नाव आहे, कमलेश महाले. आणि त्याच्या या पाच कविता. आज पहिल्यांदा पाच कविता देण्याचे कारण की अशा कवीची कविता हे विधान असते व्यवस्थेवर, अनागोंदीवर, प्रेमावर, समाजावर, समाजातील माणसावर, स्वतःवर, प्रेयसीवर, देवावर, धर्मावर आणि कशावरही. ते विधान टोकदार असेल तर त्याला विश्लेषणाची गरज भासत नाही. कमलेश महाले यांच्या कवितेवर भाष्य करण्याऐवजी, त्याच्या कविता वाचकांनी वाचाव्यात, ही बाब माझ्यासाठी आनंदाची असेल. युवा साहित्य अकादमी पुरस्कार मिळावा, इतकी या कवितांत कुवत

आहे याबाबतही माझ्या मनात दुमत नाही.

त्या पाच कविता देताना आशा करतो की कमलेश महालेच्या सगळ्या कविता लवकरच पुस्तकरूपात येतील.

१.

जुलूस मौनात असतो पानगळीचा
हा मलूल अमलताश गवाह आहे.

दूरवर तारपा वाजवत महू पिऊन झिंगला तरी,
चेहऱ्यावरची प्रत्येक रेघ स्वामिनाथनची शिफारस.

तापीचा उपसा घेऊन उपसत राहावं रोजंदारीवर
उरलंसुरलं पहिल्या धारेएवढं कडक दुःख!

कलमी झाडांखाली कलम केलेले हात.
ह्या जगातलं सगळ्यात मोठं दुःख
परसातल्या झाडांच्या मोळ्या बांधून
शहराला विकणं आहे.

बोखल्यातला विळा कोयता वय झालेल्या
म्हाताऱ्यासारखा थकून गेलाय मोच्र्यांना.
झाडावरचा चौरसिया बासरी मोडून बसलाय
मीही सोडून दिलंय ऐकणं तेव्हापासून.

कालपरवा एक गिलहरी अंगणात थांबून एकाजागी शांत.
जग थांबलं की काय?
मव्हाचे दोन थेंब लहानग्याला झोप येण्यासाठी लांबच्या प्रवासात अगदी निपचित.

हापक्याने पाणी उपसत पाटल्यांची पांढरी निशाणी
बघत वाटतं–
माझीच आय भैन मनिबेलीपासून बस्तर ते अंदमान–निकोबार आदिम जन्मठेपेत.

जगातल्या सगळ्यात लहान पक्ष्याच्या चोचीत
मावतील आमची प्रेतं.

उलगुलान म्हणत मारले गेले कैक बिरसा बांधकाम साईटवर–
वनविभागाने मारावी वाघीण आम्ही तिची उरलेली अनाथ पिल्लं.

२.

कधीतरी नदीला विचारेल तू कशीयेस?
ती काहीच बोलणार नाही मला माहितीये
ती शांत असेल शेवटच्या हिरव्या साडीतली
माझी आज्जी होती तशी कुंकू कपाळावर
तिचा प्रवाह गोष्ट सांगेल काठावर.
चित्रगुप्ताच्या एसटीत यम कंडक्टर;
कधी उचलशील मला पुढच्या प्रवासासाठी
हा असेल थांबा नदीच्या कडेनं ये!

मी नदीकडून शिकलो बापाच्या अस्थी टाकल्या
तरी, शांत राहायचं ह्या पाण्यासारखं.
शेवाळ वाढू द्यायचं नाही प्रवाह सोडायचा नाही
कुणी आलंच होडी घेऊन लाटांचं बळ द्यावं
वल्हवायला हाडं द्यावीत हाडांसाठी.

जगण्याच्या महाभारतात मीही जखम धुतली
ह्या पाण्यात आपला कुठेच उल्लेख नाही. अश्वत्थामा.
नदीला जखम झाली तर, ती कुठे धुते जखम?
भीमबेटकाच्या गुफांतून एक आवाज आर्यांपासून
आजच्या सभ्यतेपर्यंत येतो आणि म्हणतो :
हे वाहत नाही पाणी, हे नदीचं प्रेत वाहतं नदीवर.

३.

झोमॅटोच्या डिलिव्हरी बॉयएवढा रात्रपाळीचा थकवा
एक्सल शीटएवढा लांबत चाललेला थकवा
कुठूनतरी कुणीतरी यावं आणि डोक्याला तेल लावून द्यावं
ह्या शहराची मांडीही थकलेली दिवसभर
डोकं ठेवायला नकाशात असं एकही शहर नाही
माझी तहान आणि माझंच रक्त तांब्याभर प्यालो
पाणी लाल आहे त्याला रंग आहे प्यास तशीच थकलेली
संध्याकाळ थकलेली, पैसे मोजलेला सूर्यास्ताचा
व्ह्यू थकलेला

मी धावतोय आकांताने थांबलो की संपेल
मी थांबतोय स्टॉपला घरी गेलो की संपेल
मी बघतोय जग जे दोन वर्षांत संपेल
मी जगतोय म्हणजे पेशी पेशी संपेल

थकवा तसा आदिम आहे नाळ तुटण्याआधीपासून
मला माहितीये थकवा म्हणजे झोप नाही
अलार्म चाचपून बघणारी रात्रं

डोळे लागतील अशी उद्याची सकाळ नाही
थकवा एके थकवा, थकवा दुणे थकवा, थकवा त्रिक थकवा
थकव्याला थकव्याने गुणा, भागा, तरी थकवा
शहरातले मजूर मरण मागतात ड्रिल मशीन शेजारी
थकव्याला एकदाचं कबरीत निजवा थकवा

मी पृथ्वीएवढा थकलेलो आणि एक दिवस
कोलमडून पडेल तुर्कीच्या घरांसारखा
शहराच्या मलब्यात सापडेल थकवा.

४.
सबकॉन्शियसमधली नामस्मरणाची जपमाळ
तुटली असती तर बरं झालं असतं
माझ्या आवाजाला टिच पडली तेव्हाची गोष्ट

सगळे पाणवठे रडून रडून खारे झालेले
तुला भेटणं माझ्यासाठी सायबेरियन क्रेनचा प्रवास
इंतजारची वेळ ढळत जाईल तेव्हाची गोष्ट

पंख हातात धरून आणले म्हणतोस
तुझ्या हातानंच छाटले म्हणतोस
पिसं पिसं वाटले म्हणतोस
एक पक्षी रक्त सांडत जातो आभाळभर
दुसऱ्या पक्ष्याला ते गुगल मॅप वाटतं

बैचेनी उत्खनन करते खड्डा झालाय लोणारएवढा
आणि मला आठवतं बरीच वर्षं झाली
डोळ्यांच्या पाणवठ्यावर तू पाणी भरणं सोडलं
तुझ्या डोळ्यांतले प्रवासी पक्षी परत न आले तेव्हाची गोष्ट.

५.
मळभ दाखववं असा नाही हा भवताल
फोटोग्राफरनं काढावं एवढं सुंदर नाही हे दुःख
आपण खूप मोठा घास काळाचा जबडा लहान
काळाचा घास होता होता होते सकाळ
उदासी तगत्राव वर तमाशाच्या बायांसारखी
थिरकते चौफेर खूर उधळते
डिलीट करायला हात धजावत नाही
आपला मित्र गेला त्याचा सेव्ह असतो
आजतागायत नंबर

आपण जन्मलो सिझेरियनच्या पोटी
आपलं नॉर्मल असं काहीच नाही
फुलपाखरानं रंग सोडावेत एवढे पुण्यवान नाही आपण
मटणाच्या काळ्या पिशवीसारखं
हेलकावत लहानपण
टपरीवाला तेवढा ओळखतो, इतकंच आपलं मोठेपण


भिलाटीच्या नवसागरच्या पट्टीत गळा चरचर
आजोबानं बाई ठेवली
ती आपली आज्जी कुठे असेल?
ठेवलेलं असतंच मुळी अस्सं

एक घाव असतोच असतो जो दाखवता येत नाही
आपण आपल्या कहाणीतले पोतराज असतो.

**– किरण येले**
kiran.yele@gmail.com

**– कमलेश राजेंद्र महाले**
kamleshmahale16699@gmail.com

॥ग्रंथाली॥✲॥





**स्मृतिगंध**

**श्रीमती गुणाबाई रा. गाडेकर**
**यांचे आत्मचरित्र**

संपादक
**सुनीता सावरकर**

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**




**नदी वाहते आहे**

**मधुरा इंदापवार**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



# निसर्गाचा सतत विचार करायला हवा!

शरद काळे

माता भूमि पुत्रोऽहं पृथिव्याः ।

पृथ्वी माझी आई आहे आणि मी पृथ्वीचा मुलगा आहे. अथर्ववेदातील ही एक ऋचा आपल्याला खूप काही शिकवून जाते. आपण सर्व जण पृथ्वीवर राहातो त्यामुळे आपण सर्वच तिची मुले आहोत. हे नाते खूप सुंदर आहे. हे नाते बालपणीच मुलांना समजले, तर हवामानबदल हा प्रश्नच निर्माण झाला नसता. कारण ज्या आईच्या पोटी आपण जन्माला आलो, तिचे आरोग्य आपल्यामुळे कोणताही समंजस मुलगा किंवा मुलगी धोक्यात येऊ देणार नाही. हे नाते समजण्यासाठी नेमके काय करायला हवे, ह्याची निदान आपल्या देशापुरती तरी उजळणी करण्याची वेळ आली आहे. कारण दिवसेंदिवस परिस्थिती सुधारण्याऐवजी आणखी खराब होत चालली आहे, हे सहज लक्षात येते. वातावरणातील बदल सर्व जण अनुभवत आहेतच. काही शहरांमधून रस्ते व परिसर स्वच्छ झाल्याचे जाणवले, तरी छोट्या शहरांची परिस्थिती अधिक गंभीर होत चाललेली आहे. प्लास्टिकचा वापर वाढतो आहे. वाया जाणारे अन्न कमी होत नाही. मुंबई, चेन्नई, कोलकाता, दिल्ली, हैदराबाद, बंगळुरू यांसारख्या मेट्रो शहरांतून हजारो टन अन्न वाया तर जातेच आहे, आणि डम्पिंग यार्डवर हा जैविक कचरा विघटित होऊन मिथेनचे प्रमाण वाढत चालले आहे. भारत देश जगातील तिसऱ्या क्रमांकाचा मिथेन निर्माण करणारा देश आहे. सन १९९०पासून आजपर्यंत आपल्या देशातील मिथेनउत्सर्जननात ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. लोकसंख्या त्या कालावधीत ६३ टक्के वाढली आहे. आपल्या देशात सन २०२२मध्ये ९४ लाख टन प्लास्टिक निर्माण केले व दरवर्षी ते उत्पादन ३ ते ४ टक्के दराने वाढतच चालले आहे. प्लास्टिक पुनर्चक्रांकनाचा दर मात्र ७ टक्क्यांहून कमी आहे. म्हणजे पर्यावरणात आज ना उद्या वापरात नसलेले प्लास्टिक येतच राहणार आहे. आपण दरवर्षी माणशी १४ किलो प्लास्टिक वापरतो. इतर देशांच्या मानाने हे प्रमाण कमी असले तरी मुळातच जिथे प्लास्टिक वापर थांबवता येणे शक्य आहे, तोही आपण थांबवत नाही. इंधनावर होणार खर्च आणि जीवाश्मइंधनाचा वापर देशात कमी होण्याचे नाव घेत नाही. म्हणजे माणशी प्रदूषणाचा दर आपल्या देशात सतत वाढत असेल तर आपण खरोखरच पर्यावरण जपतो आहोत का? आपल्या वसुंधरा मातेचा आपण विश्वासघात करतो आहोत. याचा गांभीर्याने विचार व्हावयास हवा आहे.

बृहदारण्यक उपनिषदात सांगितले आहे की सर्व लोक सुखी आणि निरोगी व्हावेत, सर्वांचे शुभ चिंतावे आणि कुणीही दुःखी नसावे.

सर्वेपि सुखिनः संतु सर्वे संतु निरामया ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित दुःखमापनुयात।।

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्
उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम्।।

एखादी मानवी व्यक्ती लोभीपणाने निसर्गाकडून फक्त घेतच राहते, व निसर्गाला परत काहीही देत नाही, ती व्यक्ती कृतघ्न तर असतेच, पण ती सजीवांच्या नाशालाही कारणीभूत ठरते. महाउपनिषदात सांगितले आहे की हे माझे आहे, हे तुझे आहे असा विचार करणारे लोक कोत्या मनाचे असतात. ज्यांची दृष्टी विशाल असते, त्यांच्यासाठी पृथ्वी हेच त्यांचे कुटुंब असते. आजच्या वेगवान आणि एकमेकांशी भौतिक साधनांनी जोडलेल्या जगात, वसुधैव कुटुंबकम्‌चा संदेश नेहमीपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. आपण एका जागतिक गावात राहतो जिथे राष्ट्र, संस्कृती आणि लोक यांच्यातील सीमारेषा झपाट्याने पुसत होत चालल्या आहेत. त्यामुळे वसुधैव कुटुंबकम् या तत्त्वज्ञानाचा अंगीकार करणे आणि असे जग निर्माण करण्याचा प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. वसुधैव कुटुंबकम् ही एक तात्त्विक संकल्पना आहे जी सर्व प्राण्यांच्या

वैश्विक बंधुत्वाचे आणि परस्परसंबंधाचे महत्व विशद करून सांगते. प्रत्येक व्यक्ती ही जागतिक समुदायाची सदस्य आहे आणि आपण एकमेकांचा आदर केला पाहिजे, सर्वांना सन्मानाने वागवले पाहिजे. विविधतेचा स्वीकार करणे आणि सर्व देश आणि संस्कृतींमध्ये शांतता, एकता आणि सहकार्य वाढवणे हे या तत्त्वाचे उद्दिष्ट आहे. वसुधैव कुटुंबकम्‌ची भावना अधिक शांत, सुसंवादी आणि सर्वसमावेशक असे जग निर्माण करेल. ही भावना आपल्या सर्वांना या वस्तुस्थितीची आठवण करून देते की प्रत्येक व्यक्तीची एक उत्तम जग घडवण्यात भूमिका आहे.

कुटुंब समाजरचनेचा सर्वात लहान घटक आहे आणि समाजाचा एक महत्त्वाचा भाग आहे, हा बळकट असलाच पाहिजे. कुटुंबसंस्था बळकट झाल्यावर समाजाला सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त होते. इतिहास याला साक्षी आहे. इ.स.पू. ५०० ते इ.स. ३५० या सुमारे साडेआठशे वर्षांच्या काळात बिंबिसार ते समुद्रगुप्त यांच्या अधिपत्याखाली भारतातील कुटुंबसंस्था अतिशय बळकट होती. याच काळाला भारताचे सुवर्णयुग म्हणतात. त्या काळात भारताचे परराष्ट्रांशी सलोख्याचे संबंध होते. काही अपवादात्मक परिस्थितीत परकीय आक्रमणांमध्ये भारतीय राजांचा काही ठिकाणी पराभव झाला होता, पण त्यातून दीर्घकालीन परिणाम चांगलेच झाले. सामाजिक जीवनात सातत्य राखण्यासाठी कुटुंबाची भूमिका महत्त्वाची असते. जीवनात गोडवा आणि सौंदर्य वाढवणे हे कुटुंबातूनच मिळते. म्हणून, कुटुंब हा दीर्घ आणि आनंदी जीवनाचा आधार आहे. विद्वानांनी विविध मार्गांनी त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. काही जण रक्ताच्या नात्याला कुटुंब मानतात तर काही जण आई-वडील, पत्नी आणि मुलांना कुटुंब मानतात, परंतु स्वार्थी संकुचित दृष्टिकोनामुळे आज केवळ पत्नी आणि मुले हीच कुटुंबे मानली जातात. माणसाच्या घसरलेल्या विचारसरणीचा हा परिणाम आहे. खरे तर, कुटुंब हे झाडाच्या मजबूत खोडासारखे असते, ते खंबीरपणे उभे असते, त्यातील सदस्यांना आणि समाजाला आत्मीयतेची भावना देते आणि कुटुंबांबरोबरच देशाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा करते.

कुटुंबसंस्थेबाबत भारताचा विचार नेहमीच उदारमतवादी आणि व्यापक राहिला आहे. विश्वकल्याणाच्या इच्छेने ऋषीमुनींनी ज्या 'वसुधैव कुटुंबकम्'ची रचना केली होती, ती आजच्या जगासाठी मार्गदर्शक अशी विचारसरणी आहे. केवळ सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर आर्थिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातूनही संपूर्ण जगासाठी ती फायदेशीर आहे. स्वार्थी विचारसरणीमुळे गेल्या काही शतकांमध्ये कुटुंबाच्या व्याख्या बदलत राहिल्या. परिणामी, देशापासून परदेशापर्यंत संपूर्ण जागतिक परिस्थितीमध्ये अशांतता जाणवत आहे. सामाजिक आणि जागतिक शांततेसाठी संकुचित विचार सोडून कुटुंबाची नव्याने व्याख्या करण्याची गरज आहे. वसुधैव कुटुंबकम् या पवित्र भावनेला आत्मसात करूनच विश्व बंधुत्वाची भावना दृढ होईल. सर्वत्र आनंद आणि शांतता नांदेल आणि निरोगी जागतिक वातावरणालाही मजबूत पाया मिळेल. स्वामी विवेकानंद यांच्या म्हणण्यानुसार आपले प्राचीन ऋषीमुनी हे विश्वाचे आणि वास्तवाचे सातत्यपूर्ण भान असलेले आणि शास्त्रशुद्ध विचार करणारे ज्ञाते होते. मनुष्यस्वभावाचे, त्याच्या सबळ आणि दुर्बळतेचे त्यांचे आकलन अचूक होते. मनुष्याने स्वतःच्या मर्यादा ओळखून वागले पाहिजे, शाश्वत मूल्यांची जोपासना केली पाहिजे यावर त्यांनी भर दिला होता. उत्पद्यत्ने विलयन्ते। म्हणजे जे उत्पन्न होते, ते लयास जाते हा विश्वाचा नियम असला तरी उत्पत्ती आणि लय यात वृद्धी आहे आणि लयानंतर उत्पत्तीही आहे, हेही निसर्गनियमाला अनुसरूनच आहे. वृद्धी आणि लयानंतरची उत्पत्ती या दोन्ही संकल्पना समजावून घेतल्या तर शाश्वततेचा अर्थ समजतो. शाश्वततेचा अर्थ समजल्यानंतर मग त्यासाठी अनुकूल जीवनशैली ठरवणे सोपे जाते.

कुटुंबसंस्था व पर्यायाने मानव यांची भूमिका सुखी, समाधानी आणि समृद्ध जीवनासाठी महत्त्वाची असली तरी समृद्धी म्हणजे नेमके काय हा अर्थही महत्त्वाचा ठरतो. तो अर्थ समजावून घेताना आपल्या पर्यावरणाची आणि परिसंस्थेची (इकोसिस्टीम) महती लक्षात येते. परिसंस्था नसेल तर मानवी जीवन शून्य आहे. या परिसंस्थेत विश्वाच्या निर्मितीनंतर विविध प्राणी जन्माला आले. मानव त्यातील एक प्राणी होय. म्हणूनच सृष्टी, निसर्गाला पर्यावरण म्हणतात. विश्वाचा निर्माता म्हणून ब्रह्मा, पालक म्हणून भगवान विष्णू आणि संहारक म्हणून शिवा अशी या तिन्ही शक्तींची ओळख भारतीय संस्कृतीत करून देण्यात आली. भारतीय संस्कृतीत जसा हा आधार घेतला गेला, तसाच जगाच्या पाठीवर उदयास आलेल्या इतर मानवी संस्कृतींमध्येदेखील अशाच प्रकारे जनमानसाला जीवनाचा अर्थ सांगण्यात आला. मानव भक्तिभावाने देवांची पूजा करू लागला. त्या भक्तीतून मानव व देव ह्यांच्यात बंध निर्माण झाला. भक्तिमार्गातून एकात्मता व जागृती साधण्याचे कार्य ह्या भारतभूमीतील विविध संत महात्म्यांनी केले. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत रामदास, संत तुकाराम, संत नामदेव, संत गाडगेमहाराज यांच्या प्रामुख्याने यात उल्लेख करावा लागेल. त्यांच्या साहित्यसंपदेतून समाजाला पर्यावरण शिक्षणाबरोबरच संस्कृतीसंवर्धन व योग्य आचारविचार ह्यांचाही लाभ झाला.

पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन मोठ्या प्रमाणावर होणे किती आवश्यक आहे याची जाणीव आता मानवाला होऊ लागली आहे. आधुनिकीकरणाच्या हव्यासापायी निसर्गावर विजय मिळवण्याच्या उन्मादात मानवाने प्रचंड स्वरूपात वृक्षतोड करून पृथ्वीवरच्या पर्यावरणाची

धूळधाण उडवली आहे. आज वाढत्या औद्योगिकीकरणामुळे जगातील सर्व शहरांतील वातावरण दूषित होत चालले आहे. विविध कारखान्यांतून व वाहनांतून बाहेर पडणारा धूर व वाढत्या वातानुकूल यंत्रणा वापरल्यामुळे हवेच्या प्रदूषणाबरोबरच पृथ्वीभोवतीच्या ओझोनचा थर कमी होत चाललेला आहे. त्यामुळे त्वचेच्या कर्करोगासारखे भयानक रोग होण्याची भीतीही पर्यावरण तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या सर्वांमुळे पृथ्वीचे तापमान वाढले आहे. प्रचंड प्रमाणावर वृक्षतोड होऊन, वणवे पेटून जंगले कमी होऊ लागली आहेत. त्यामुळे जमिनीची धूप होऊन ऑक्सिजनचे प्रमाण कमी होईल की काय अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. नद्यांच्या खोऱ्यातील व धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील भाग बेसुमार जंगलतोडीने उजाड बनला आहे. त्यामुळे पाऊसही लहरी बनला आहे. नजीकच्या भविष्यकाळात पाणी आणि वीजपुरवठ्याची समस्या निर्माण होणार आहे. पुढे उभ्या राहणाऱ्या या नैसर्गिक आपत्तीला तोंड देऊन ही सर्व परिस्थिती सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाची आणि वृक्षसंवर्धनाचीच आवश्यकता आहे.

आज परिस्थती अशी आहे की आपण सर्व जण आपल्या ऐहिक सुखासाठी आपली कर्तव्ये विसरत चाललो आहे. वसुंधरा केव्हाची रडत आहे, पण तिचे रडणे आपल्याला ऐकू येत नाही. तिच्या वेदना आपल्याला समजत नाहीत. मी एकटा काय करू शकतो असा हतबल प्रश्न विचारण्याऐवजी, आपण असा का विचार करू नये की माझे शरीर त्याच पंचमहाभूतांचे बनलेले आहे, ज्याने हे विश्व बनलेले आहे. माझे शरीर परत याच पंचतत्त्वांमध्ये सामावणारा आहे. मग या पंचतत्त्वांच्या अक्षयतेसाठी मी प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी मी कुणाची वाट पाहण्याची गरज नाही. सुरुवात एकापासून होते आणि त्याचे एकात्मिक परिणाम वसुंधरेवर होतात. प्रदूषण रोखण्यासाठी मी माझ्यापरीने सर्व प्रयत्न केले तर मला नक्कीच शांती लाभेल. ह्यातच आपले व वसुंधरेचे कल्याण होणार आहे.

**वसुंधरेचे अश्रू**

कचऱ्याच्या ढिगाकडं अलिप्तपणे बघता येतं
ते ढीग असणार असं गृहीतच धरलेलं असतं!
ते ढीग कमी करायला हवेत असं वाटतच नसतं
खरं दुःख तर नेमकं तेच असतं!

कचऱ्याच्या ढिगाकडं पाहात
विज्ञान खंत करत असतं
विज्ञानाचं खंतावणं अस्वस्थ करत असतं
वसुंधारेच्या डोळ्यांत पाणी आणत असतं!

वसुंधारेची आसवं सर्वांनाच दिसत असतात
आसवांची कहाणी सर्वांनाच ठाऊक असते
त्यावर उपाय करण्यासाठी कुणीच तयार नसतं!
कारण वेळ नावाची चीज कुणाकडेच नसते!

वसुंधरेचं मन रडत असतं तेव्हा
तिचे अश्रू दिसतीलच असं नसतं
वाहणारे अश्रू ज्यांना दिसतात
त्यांनाच खरं काय ते कळत असतं!

विविध संतांचे पर्यावरणावरील विचार आपल्याला अंतर्मुख करायला लावणारे आहेत. परंतु ते आजच्या घटकेला मागे पडत चालले आहेत, ही खरी खंत आहे. संतांची शिकवण वाचायला वेळ कुणाकडेच नाही. हातातील मोबाईलशिवाय माहितीचा दुसरा पर्यायच उरलेला नाही, कारण अवांतर वाचन बंद आहे. आपल्याला नेमके कोणते प्रश्न सतावत आहेत, हेही माहिती आहे! नेमके कोणते प्रश्न सतावत आहेत याची माहिती आहे,

१. कुटुंबसंस्था मोडकळीस येत आहे. त्यामळे संवेदना कमी होत आहेत.
२. ऐहिक सुखासाठी आणि वैयक्तिक ऐषोआरामासाठी पर्यावरणीय मूल्ये पायदळी तुडवली जात आहेत.
३. वाढत्या इंधनवापरामुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढत चालले आहे.
४. अन्न बिनदिक्कतपणे वाया घालवण्याची प्रवृत्ती वाढते आहे.
५. प्लास्टिकचा अनिर्बंध वापर वाढत चालला आहे.
६. कचऱ्याचे प्रमाण गेल्या चार दशकांमध्ये माणशी १५ ते २० पट वाढले आहे.
७. वृक्षांची संख्या झपाट्याने कमी होत आहे.

त्यावर काय उपाय करायला हवेत हेही माहीत आहे. प्लास्टिक वापरणे थांबवणे इतके का कठीण आहे? विचार केला तर खूप सोपे आहे. कापडी पिशव्या हा प्लास्टिक पिशव्यांसाठी पर्याय आहे. अन्न टाकून न देणे हा पर्याय मिथेन कमी करणार आहे. शिवाय अन्न टाकून दिले नाही, तर भुकेल्या लोकांच्या पोटी दोन घास जाणार आहेत. आपल्याला नको असलेल्या वस्तू ज्यांना त्या हव्या आहेत, त्यांना देण्याने कचरा तर कमी होईलच, संसाधनांचा समतोल साधण्यासही मदत होईल. इतक्या साध्या उपायांनी आपल्याला वसुंधरेचे अश्रू थांबवता येत असतील, तर मग उशीर कशाला करायचा? चला, आजपासूनच सुरुवात करू!

**– शरद काळे**
sharadkale@gmail.com



# गुरुदत्त

डॉ. श्रीकांत परळकर

हेन्‍री मिचेल (मिशेल) हे फ्रेंच विद्वान भारतीय चित्रपटांचे गाढे अभ्यासक. सत्यजित रे, मृणाल सेन व गुरुदत्त यांच्या जीवनावर हेन्‍री यांनी अतिशय अभ्यासपूर्ण शोधनिबंध फ्रेंच भाषेत लिहिले आहेत. रे, सेन व गुरुदत्त यांचे चित्रपट फ्रेंच प्रेक्षकांत लोकप्रिय असले तरी गुरुदत्त यांचे चित्रपट व त्यातील व्यक्ती फ्रेंच कौटुंबिक व सामाजिक जीवनाशी अधिक निकटचा संबंध साधू शकणारे असतात म्हणून त्या चित्रपटांना फ्रेंच प्रेक्षकांची अधिक दाद मिळते असे निरीक्षण हेन्‍री यांनी नोंद करून ठेवले आहे. गुरुदत्त यांच्या निधनानंतर जवळपास दहा वर्षांनी, १९७४ च्या सुमारास हेन्‍री मिचेल यांनी त्यांचा जीवनपट आणि त्यांची चित्रपट कारकीर्द अभ्यासण्यास सुरूवात केली. विशेष म्हणजे हिंदी भाषेचे ज्ञान नसताना व गुरुदत्त यांचे चित्रपट फ्रच सबटायटलविना पाहून मिशेल यांनी त्यांच्या चित्रपटावर केलेले लेखन अभ्यासपूर्ण, उत्कृष्ट व सखोल ठरले. देशी-विदेशी चित्रपटांच्या वर्तमानकालीन प्रेक्षकांनी याची अवश्य दखल घ्यावी.

गुरुदत्त यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्यांचा जन्म कर्नाटक राज्यातील मंगरूळ येथील मध्यमवर्गीय सारस्वत कुळातील पदुकोण परिवारात, ९ जुलै १९२५ रोजी झाला. त्यांचे वडील शिवशंकर व आई वासंती यांचे गुरुदत्त हे पहिले अपत्य. ते पाच वर्षांचे असतांना पदुकोण परिवारास व्यवसायानिमित्त कोलकाता येथे स्थलांतरीत व्हावे लागले. त्याच सुमारास कोलकात्यात कला आणि संस्कृती क्षेत्रात चांगली भरभराट होत होती. त्याजोडीला न्यू थिएटर्स नामक चित्रपट संस्थेच्या स्थापनेनंतर तेथील चित्रपट उद्योगही प्रगतिपथावर चालू लागला होता. गुरुदत्त यांना मिळालेल्या प्राथमिक शिक्षणातून त्याच्यावर वंग कला व संस्कृती यांचे सखोल संस्कार होणे साहजिक होते असे म्हणावे लागेल. आपल्या आयुष्याच्या भविष्यातील काम गिरीसाठी पुस्तकी विद्येचा फारसा उपयोग नाही हे त्यांनी वेळीच ओळखले असावे, म्हणून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होताच गुरुदत्त



गुरुदत्त

यांनी शिक्षणाला रामराम ठोकला.

तत्कालीन उत्तर प्रदेशातील (आताचे उत्तराखंड) अल्मोडा जिल्ह्यात उदयशंकर यांचे नाव सांस्कृतीक केंद्र व संगीत क्षोत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे नावरूपास आले होते. बाबा अलिउद्दीन खाँ, अलीअकबर खाँ, रविशंकर, जोहरा सैगल, उजरा बट्ट यांच्यासारखे भविष्यात दिग्गज झालेले कलाकार याच सांस्कृतिक गुरुकुलकेंद्रात कलेची उपासना करत होते. कलाक्षेत्रात लहानपणापासून आवड असलेल्या गुरुदत्त यांना उदय शंकर यांच्या केंद्राचे नाव समजले तेव्हा त्यांना आपल्या भविष्याचा मार्ग गवसल्यासारखे झाले आणि १९४२ च्या सुमारास तेथे दाखल होण्यास ते अल्मोडा येथे पोहोचले. त्या प्रख्यात केंद्रातून मिळणारे सिद्धहस्त मार्गदर्शन आणि वरील दिग्गज कलाकारांचा सहवास यांचा अगोदरच संस्कारक्षम असलेल्या गुरुदत्तना फार मोठा फायदा झाला व दोन वर्षांच्या कालावधीत त्यांनी संगीत व कलाक्षेत्रात दर्जेदार प्रगती केली.

या अनुभवाचा लाभ पुढे पुण्याच्या प्रभात स्टुडिओमध्ये चित्रपटकलेचे शिस्तबद्ध शिक्षण घेताना झाला. १९४४मध्ये प्रभात स्टुडिओमध्ये दाखल झाल्यावर काही वर्षातच विश्राम बेडेकर यांच्या चित्रपटासाठी साहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करताना त्याच चित्रपटात एक लहान भूमिकासुद्धा केली. दोन तीन वर्षांनी दुर्गा खोटे, रेहाना व कमल कोटणीस या कलाकारांना घेऊन पी.एल. संतोषी यांनी 'हम एक है' चित्रपट दिग्दर्शित केला. या चित्रपटात देव आनंद याने चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते आणि या चित्रपटातील नृत्यांचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले होते. प्रस्तुत चित्रपटामुळे देव आनंद व गुरुदत्त यांची दोस्ती झाली व ती पुढे इतकी दाट होत गेली की देव आनंदने कंपनी काढून चित्रपट बनवल्यास गुरुदत्त त्याचे दिग्दर्शन करणार आणि गुरुदत्त यांनी चित्रपट कंपनी सुरू केल्यास देव आनंद तेथे नायकाची भूमिका करणार अशी वचने या दोघांनी एकमेकांना दिली.

कालांतराने कोलकात्याचा निरोप घेऊन गुरुदत्त मुंबईतील बॉम्बे टॉकिजमध्ये दाखल झाले व तेथे त्यांनी 'गर्ल्स स्कूल' व 'संग्राम' या चित्रपटांसाठी साहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले. आदिनाथ बॅनर्जी दिग्दर्शीत मोहन चित्रपटात देव आनंदकडे नायकाची भूमिका होती व योगोयोगाने साहाय्यक दिग्दर्शकाची कामगिरी गुरुदत्तकडे होती. त्यामुळे दोघांतील जुन्या स्मृतीला उजाळा तर मिळालाच शिवाय एकमेकांना दिलेल्या वचनाचीही आठवण झाली व त्या दृष्टीने काहीतरी करण्याचा निश्चयही पुन्हा एकदा केला गेला. परंतु तो काळ चित्रपटसृष्टीसाठी तितकासा अनुकूल नव्हता. दुसऱ्या महायुद्धामुळे चित्रपटसृष्टीला अगोदरच तडाखे बसले होते. यंत्रसामग्री, फिल्म यांच्या आयातीवर निर्बंध आले होते. चित्रपटांच्या कथानकावरही निर्बंध आले होते. एकंदरीत परिस्थिती क्रमाने बिकट होत होती. युद्ध संपल्यानंतरही इतर उद्योगांप्रमाणे सिनेउद्योग डळमळीत होत होता. आपल्या कथाप्रधान चित्रपटाचा दर्जा सांभाळण्याचा लौकिक जपणाऱ्या कोलकात्यातील न्यू थिएटर्स व पुण्यातील प्रभात स्टुडिओ या संस्था व हलक्याफुलक्या चित्रपटावर भर देणारी हिमांशू राय यांची बॉम्बे टॉकिज संस्था याचीही स्थिती फार चांगली नव्हती. दुर्दैवाने अल्मोडाचे सांस्कृतिक केंद्रही याच सुमारास बंद पडल्याने त्या केंद्रातील बुजूर्ग कलाकार मंडळी मुंबईत 'इप्टा' संस्थेत आसरा शोधू लागली.

देशाच्या फाळणीनंतर भारतीय चित्रपट उद्योगाची बेसुमार हानी होऊन तो खाली बसण्याच्या मार्गावर लागला. काही नाम वंत कलाकार मंडळी देश सोडून पाकिस्तानमध्ये जाऊ लागली. तर काही जण कामधंद्याच्या आशेने मुंबईत थडकू लागले. जवळपास त्याचसुमारास चेतन आनंद याने धाकटा भाऊ देव आनंद याच्यासह 'नवकेतन' नामक चित्रपट संस्थेची स्थापना



'प्यासा'मधील दृश्य

केली. देव आनंद व सुरैया यांची प्रमुख भूमिका असलेला 'अफसर' हा चित्रपट तयार केला. सचिन देव बर्मन यांनी या चित्रपटाला संगीत दिल्यामुळे त्यातील गाणी लोकप्रिय झाली, परंतु एकूण चित्रपट मात्र सुमारच ठरला. लवकरच 'बाजी' या चित्रपटासाठी देव आनंदने गुरुदत्तना बलराज साहनीसह पटकथा तयार करण्याचे काम दिले व संपूर्ण चित्रपट दिग्दर्शनाची कामगिरी गुरुदत्त यांच्यावर सोपवली. देव आनंदने मैत्रीला जागून वचनाची अशी पूर्ती केली. साहिर लुधियानवी यांनी लिहिलेल्या गीतांना सचिन देव बर्मन यांचे संगीत व गायिका गीता राय (नंतरची गीता दत्त) यामुळे 'बाजी' वैशिष्ट्यपूर्ण ठरला. 'तदबीरसे बिगडी हुई तकदीर बनादे', 'अपने पे भरोसा तो एक दांवा लगा ले' आणि 'सुनो गजर क्या गाए, समय गुजरता जाये,' ही गीता दत्तने गायलेली गाणी आजही आवर्जून ऐकला जात आहेत. नंतरच्या काळात 'जाल' (देव आनंद व गीता बाली) व 'आरपार' हे गुरुदत्त दिग्दर्शित चित्रपट (विशेषत: आरपार) धमाल उडवून देणारे ठरले. शमशाद बेगमने गायलेली आरपारमधील 'कभी आर कभी पार लागा तीरे नजर' व 'ऐ लो मै हारी पिया' (गीता दत्त) ही गाणी पन्नास वर्षे लोटल्यावरसुद्धा सदाबहार आणि लोकप्रिय ठरली.

१९५५मध्ये गुरुदत्त फिल्म प्रॉडक्शनचा मिस्टर एंड मिसेस ५५ हा मधुबालासारख्या अव्वल तारकेला घेऊन काढलेला चित्रपट तितकाच लोकप्रिय ठरला. वर्षभरातच सी.आय.डी. चित्रपटात देव आनंद यास नायकाची भूमिका देऊन गुरुदत्तनेही दोस्ताला दिलेला शब्द पाळला. या संगीतप्रधान चित्रपटाच्या निमित्ताने वहिदा रेहमानने चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले. खरे पाहिल्यास 'बाजी'पासून 'मिस्टर ॲन्ड मिसेस ५५'पर्यंतच्या चित्रपटांवर हॉलिवूड शैलीची नि:संशयपणे छाप दिसून येई व गुरुदत्तना त्याची जाणीवही होती. आता यापुढे काहीतरी वेगळे रचनात्मक असे प्रयोग करूनच ते प्रेक्षकांपुढे उभे करायचे, काहीतरी उल्लेखनीय निर्मिती करून दाखवायची असे त्यांना

मनापसून वाटू लागले. या विचारांची परिणती म्हणजे ‘प्यासा’ चित्रपटाची निर्मिती. ‘प्यासा’चे कथानक गुरुदत्त यांच्या मनात ‘बाजी’ चित्रपटाच्या निर्मितीपसून घोळत होते. परंतु ते मूर्त स्वरूपात आणण्यासाठी त्यांना मध्यंतरीच्या काळात आलेल्या अनुभावरून बरेच आराखडे मांडावे लागले. प्यासा चित्रपट हा भारतीय प्रेक्षकांसह आशिया आणि युरोपातील प्रेक्षकातही कमालीचा लोकप्रिय ठरला. प्यासाच्या यशामुळे स्वाभाविकपणे उल्हासित होऊन दोन वर्षांच्या आत ‘कागज के फूल’ या सिनेमस्कोप चित्रपटाच्या तयारीला लागले. जॉनी वॉकर, महमूद, वीणा यांच्या उत्कृष्ट भूमिका त्या चित्रपटात होत्या. त्याहून अधिक म्हणजे बी.के. मूर्ती यांचे अती उत्कृष्ट ब्लॅक ॲन्ड व्हाईट छायाचित्रण या चित्रपटाला लाभले होते. गुरुदत्त यांना ‘कागज के फूल’मुळे उत्तम दर्जा प्राप्त झाला खरा परंतु मनाजोगा आर्थिक फायदा मात्र झाला नाही. एक संथ गतीचा चित्रपट हे त्याचे कारण असावे. तीन-चार वर्षांच्या कालावधीनंतर मुस्लीम घाट असलेला एक वेगळ्याच धर्तीचा ‘चौदहवी का चाँद’ चित्रपट गुरुदत्त यांनी तयार केला. व त्यात त्यांनी वहिदा रेहमानसह प्रमुख भूमिका केली. रहमान, जॉनी वॉकर, मीनू मुमताज अशा कलाकारांचा सहभाग, संगीतकार रवी यांचे संगीतदिग्दर्शन, रंगीत छायाचित्रण असलेला हा चित्रपट महमद रफी यांनी गायलेल्या ‘चौदहवी का चाँद हो, या आफताब हो’ या गाण्याणुळे बेसुमार गाजला.

१९६२च्या सुमारास गुरुदत्त यांनी बिमल रॉय यांच्या कादंबरीवर बेतलेला ‘साहब बीबी और गुलाम’ (दिग्दर्शक- अबरार अली) आणला. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे राष्ट्रीय परितोषिक मिळाले. ‘प्यासा’च्या आर्थिक अपयशाने निराश झालेल्या गुरुदत्त यांना दारूचे व्यसन लागले. तरीही पूर्वी न्यू थिएटर्सने बनवलेल्या ‘प्रेसिडेन्ट’ या चित्रपटावर आधारीत हिंदी आवृत्ती काढण्याची कल्पना गुरुदत्त यांच्या मनात आली. दिग्दर्शनाची जबाबदारी शाहिद लतिफ, पत्रकार असलेल्या नायकाची भूमिका गुरुदत्त, नायिका माला सिन्हा व संगीत ओ.पी. नय्यर अशी या चित्रपटाची तयारी होती. या चित्रपटाची काही रिळे तयार झाली व गुरुदत्त यांची तब्येत सावरण्यापलीकडे ढासळली व १० आक्टोबर १९६४ रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

**- डॉ. श्रीकांत परळकर**
shriparalkar@gmail.com

॥ग्रंथाली॥




**हा ध्यास जीवनाचा**

**शिल्पगंधर्व सदाशिव साठे यांचे आत्मकथन**

सहलेखन-शब्दांकन
**सतीश कान्हेरे**


**मूल्य ७५० रुपये**
**सवलतीत ४५० रुपये**

**राजा जाधव**
**यांचा जीवनप्रवास**


**दादर ते दादर**

**दादासाहेब दापोलीकर**

**मूल्य ७५० रुपये**
**सवलतीत ४५० रुपये**




**शरद काळे यांची दोन पुस्तके**




**Almitra Patel**
Waste Warrior

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**

**अवघड वळणाच्या खडतर वाटेवर**

**अल्मिता पटेल**

**(पर्यावरणासाठी जीवन समर्पित केलेली विदुषी)**

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**





# हॅपी बर्थ डे लतादीदी

अबोली ठोसर

लता मंगेशकर

एक नाव... जे लहान असल्यापासून ऐकत होते, त्यांची गाणी ऐकत होते, त्यांच्या गाण्यांवर सदैव मंत्रमुग्ध झालेले माझे आई-बाबा बघत होते. बाबा तर निस्सीम लता चाहते होते! लतादीदींचा अगदी तरुण वयातला एक फोटो बाबांना मिळालेला. ब्लॅक अँड व्हाईट फोटो. तो फोटो वर्षानुवर्षे आमच्या घरात फ्रेम करून ठेवलेला पाहिला होता. एवढे बाबा लताभक्त होते! पण असे कधी स्वप्नात पण वाटले नाही की त्या अजरामर, अलौकिक लतादीदींना मी आयुष्यात इतक्या जवळून बघेन! ते पण नुसते एक-दोन वेळा नाही तर कमीत कमी शंभर वेळा तरी त्यांच्या सहवासात वेळ घालवायला मिळेल, तोही सलग सहा ते आठ तास! प्रत्येक वेळी.

आमच्या घरात मुळातच गाण्याची प्रचंड आवड. आई तर लग्नाआधी गायची आणि बाबा पण गायचे. कालांतराने दोघांचेही गाणे बंद झाले. परंतु मला त्यांनी गाणे शिकू दिले त्यामुळे त्या दोघांचीही मी ऋणी आहे!

आज जे लिहिते आहे तो पण एक अनुभवच होता कारण फिल्म इंडस्ट्रीमध्ये, कुठलीही ओळख वा नातेवाईक नसतांना सुद्धा मला इथे एवढ्या सहजपणे प्रवेश मिळाला त्यासाठी मला ज्यांनी मदत केली त्यांचे आभार मानायचे आहेत! दुर्दैवाने आज ते तिघेही हयात नाहीत!

सर्वप्रथम मी ऋणी आहे ज्यांची माझे वडील, डॉक्टर नीळकंठ नारायण ठोसर.. हे डोंबिवलीतील एक नामवंत, निष्णात आणि त्यांच्या डायग्नोसिससाठी प्रसिद्ध असे एमबीबीएस, जनरल प्रॅक्टिशनर होते आणि माझी आई मीरा, ज्यांच्यामुळे मी गाणे शिकायला लागले, मला गाण्याची आवड लागली.

बाबांच्या डायग्नोसिसमुळेच एक पेशंट एके दिवशी बाबांकडे एकांना घेऊन आले. बाबांनी लगेचच ओळखले. ते प्रसिद्ध संगीतकार दशरथ पुजारी होते. पुजारीसरांना जे काही दुखणे होते ते कितीतरी डॉक्टरांकडे जाऊन त्यांना बरे वाटले नव्हते, पण बाबांच्या ट्रीटमेंटने त्यांना पहिल्याच डोसमुळे बराच फायदा व्हायला लागला. त्यांनी बाबांना फी विचारली तर बाबांनी अर्थातच नाकारली. त्यावर सर म्हणाले की असे नाही डॉक्टर, फी नाही तर नाही पण माझ्या लायक काही काम असेल तर सांगाल. त्यांनी असे अनेक वेळा म्हटल्यावर बाबांनी थोडेसे बिचकतच विचारले की माझ्या मुलीला गाणे शिकवू शकाल का? त्यांनी त्वरित होकार दिला. आणि अशा तऱ्हेने माझे सुगम संगीताचे शिक्षण माझ्या घरी तर कधी सरांच्या घरी सुरू झाले. सरांच्या क्लासची गुरुपौर्णिमा, त्यांचे इतर काही कार्यक्रम असे मला सरांबरोबर गायचे आणि स्वतंत्रपणे गाणे गायचे अनुभव मिळू लागले.

मला गांधर्व महाविद्यालयाची शास्त्रीय संगीताची संगीत विशारद ही पदवी बारावीत असतानाच मिळाली होती. पहिल्यापासूनच माझा शास्त्रीय संगीतापेक्षा सुगम संगीताकडे जास्त ओढा होता. तरी शास्त्रीय संगीताचा पाया असला तर सुगम संगीत शिकण्यास मदत होईल हे आईबाबा जाणून होते त्यामुळे त्यांनी, मी, अगदी दुसरी किंवा तिसरीत असतानाच, जबरदस्तीने, मला गाण्याच्या क्लासला टाकले होते. शास्त्रीय संगीताचा पाया भक्कम झाल्याने त्याचा मला खूपच उपयोग झाला फिल्म इंडस्ट्रीमध्ये गेल्यावर (हे पुढे उमगले पण लहान असताना आईबाबांचा खूप राग आला होता गाण्याच्या क्लासला घातले म्हणून!)

दोन वेळाच पुजारीसरांकडे क्लासला गेल्यावर तिसऱ्या वेळेस पुजारीसर म्हणाले की मला तुझ्या आईबाबांशी बोलायचे आहे. पुढल्या क्लासला घरी आल्यावर पुजारीसर आईबाबांना म्हणाले, तुमची परवानगी असेल आणि माझ्यावर विश्वास असेल तर मला हिची ओळख अनिल शी करून द्यायची आहे. त्यांनी असे इतक्या एकेरी नावाने संबोधल्यावर आम्हाला कळले नाही की कोण अनिल? तसे पुजारीसर म्हणाले अनिल मोहिले.

बापरे! माझे डोळे एकदमच विस्फारले.

अशा रितीने, अगदी सहजपणे माझी सुप्रसिद्ध संगीत संयोजक आणि अनिल-अरुण या संगीतकार जोडीतले अनिल मोहिले ह्यांच्याशी ओळख झाली. मग अनिलजींनी त्यांच्या व इतरही कार्यक्रमांत आणि ते फिल्म इंडस्ट्रीमध्ये जिथे अरेंजर म्हणून कार्यरत होते, तिथे तिथे मला कोरस सिंगर म्हणून बोलावायला सुरुवात केली.

अनिलजी स्वतः अतिशय उत्कृष्ट आणि अतिजलद गतीने पण अचूक असे नोटेशन लिहिण्यासाठी प्रसिद्ध होते. त्यांच्यामुळेच मला थोडेफार नोटेशन लिहायला-वाचायला आणि वाचून गायला शिकता आले. एकदा तर त्यांनी आमच्या लॅण्डलाइनवर फोन केला होता आणि आमच्या घराची बेल वाजली ती बेल नुसत्या फोनवर ऐकून मला लगेच सूर सांगितला आणि म्हणाले की तुमच्या घराची बेल ह्या ह्या सुरात आहे. इतके ते सुरांमध्ये बुडालेले आणि कान तयार असलेले असे संगीतकार होते.

तर अनिलजींकडून एक दिवस मला फोन आला की एक रेकॉर्डिंग आहे उद्या सकाळी वेस्टर्न आऊटडोअर ह्या स्टुडिओमध्ये. मी कोणाचे रेकॉर्डिंग, कसले रेकॉर्डिंग , कोण असतात बरोबर वगैरे काहीच विचारले नाही आणि गेले रेकॉर्डिंगला त्यांनी सांगितलेल्या पत्त्यावर. तो स्टुडिओ फोर्टमध्ये आरबीआयच्या मेन ब्रँच समोरच्या बिल्डिंगमध्ये होता. चौथ्या किंवा पाचव्या मजल्यावर. मी पहिल्यांदाच असा स्टुडिओ बघत होते. दार उघडले तर आतमध्ये हा गोंगाट... कमीत कमी ४० बायका, ४० पुरुष. मी कोणालाच ओळखत नव्हते. सगळेच वातावरण नवीन, नवखे माझ्यासाठी. मग अनिलजींनी ओळख करून दिली. एक-दोघांना सांगितले की हिला मेसेंजरचे नंबर द्या आणि हिला इतर रेकॉर्डिंगना पण बोलवा. चांगली गाते ही मुलगी. असे बोलून ते आतमध्ये रेकॉर्डिस्टच्या खोलीत निघून गेले. मग बाकीचे सगळे परत गप्पाटप्पा करण्यात व्यग्र झाले. मी नुसते हाय हॅलो करून गप्प बसले होते आणि तेवढ्यात दरवाजा उघडला आणि छुन्न असा आवाज करत एक पाऊल स्टुडिओमध्ये पडले आणि सगळे एका क्षणात शांत झाले...एकदम नीरव शांतता. पिनड्रॉप सायलेन्स कशाला म्हणतात ते पहिल्यांदाच कळले मला! सगळे एकदम उठून उभे राहिले. आतमधून अनिलजी आणि रेकॉर्डिस्ट धावत बाहेर आले! मला कळेच ना की अचानक काय झाले सगळ्यांना... आणि मग... मी पाहिले की एक छोटीशी बुटकीशी बाई... श्वेतवर्णी चंदेरी साडी नेसून, दोन लांब वेण्या घालून... विनम्र होऊन, दोन्ही हात जोडून... छुन्न छुन्न असा सोन्याच्या पैंजणांच्या घुंगरांचा आवाज करत आत येतेय आणि... आणि... आणि... माझा विश्वासच बसेना माझ्या डोळ्यांवर... कारण मी समोर बघत होते... तर... सुरांची



लतादीदी आणि अनिल मोहिले यांच्यासह

मल्लिका... मेलडी क्वीन... ज्यांच्या गळ्यात गंधार आहे... कंबख्त कभी बेसुरी ही नहीं होती!... ज्यांच्यासाठी दस्तुरखुद्द पु.ल. देशपांडे ह्यांनी म्हटले आहे की ह्या जगात सूर्य आहे, चंद्र आहे आणि हिचा आवाज आहे... अशा अनेक विविध उपमा ज्यांच्यासाठी दिल्या गेल्या आहेत त्या दीदी नावाने संबोधल्या जाणाऱ्या साक्षात लता मंगेशकर!

त्या रेकॉर्डिंगनंतर साधारण एक-दोन दिवसांतच अनिलजींनी फोन केला, ज्यामुळे माझ्या आयुष्यात एक सोनेरी क्षण अवतरला. अनिलजींनी फोन करून विचारले, की 'लतादीदींचा लाइव्ह कॉन्सर्ट आहे, तुला कोरस गायक म्हणून गायला आवडेल का त्यांच्या प्रोग्रॅमला?' मी म्हटले, 'हो जरूर आवडेल, हा माझ्यासाठी मोठा सन्मान असेल.' तसे म्हणाले, 'उद्या घरी ये, सगळी नोटेशन एकदा डोळ्यांखालून घाल, हवी ती कॉपी करून घे, प्रॅक्टिस कर थोडीशी, कारण ह्या रविवारपासून शिवसेना भवन इथे रिहर्सल असतील प्रत्येक रविवारी! तुझ्या बरोबरच्या सगळ्या, फिल्म इंडस्ट्रीमध्ये बरेच ठिकाणी कोरस गायलेल्या अनुभवी आहेत पण तू एकटीच अशी आहेस की जिला फिल्म इंडस्ट्रीचा कामाचा काहीही अनुभव नाही, पण फक्त तू चांगली गातेस आणि मेहनती आहेस म्हणून पहिल्यांदाच तुला इथे गायची संधी मिळते आहे. त्यामुळे एकदा माझ्यासमोर गाण्यांची रिहर्सल कर, म्हणजे तुला प्रॉब्लेम येणार नाही.' त्यामुळे अनिलजींनी म्हटले तसे मी त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या डायरीमधून, सर्व कोरसची, असतील नसतील ती गाणी लिहून घेतली, त्यांच्यासमोर थोडी प्रॅक्टिस केली. आणि मग...

सर्व तयारीनिशी रविवारी सकाळी १० वाजता शिवसेना भवन येथे पहिल्या मजल्यावरच्या हॉलमध्ये पोचले. बघते तर काय... कमीत कमी १५० लोके तरी त्या हॉलमध्ये होते... थोड्या वेळाने कळले की कोरस व वादकांसह १०८ जण होते. असा हा कार्यक्रम होणार आहे, THE QUEEN IN CONCERT, अंधेरी स्पोर्ट्स क्लबला, ९ मार्च १९९७ रोजी!

आम्हाला सांगितले तिथे कोरसच्या जागी खुर्च्या घेऊन बसलो, समोर हृदयनाथ मंगेशकर, अनिलजी, सुदेश भोसले, उषा मंगेशकर, बालूजी (एस.पी. बालसुब्रमण्यम) आणि स्वतः साक्षात लतादीदी... तशी एकेक जण उठून दीदी हृदयनाथजी बालूजी ह्यांना नमस्कार करून जागेवर येऊन बसलो!... दीदी आणि सर्व सिंगर, हॉलच्या मध्यभागी बसले होते आणि समोर, डावीकडे, उजवीकडे सर्व कोरस व वादक कलाकार होते.

एवढ्या सगळ्या वादकांमध्ये आणि कोरसच्या गोंगाटामध्येसुद्धा... माईक नसूनही आम्हाला दीदींचा आवाज क्लिअर ऐकू येत होता. ह्यावर माझा आजही विश्वास नाही बसत. बाकी सगळे गात असताना फार कमी वेळा, अधूनमधून गाण्यातली उंच स्वराची जागा असेल तेव्हाच फक्त त्यांचा आवाज ऐकू यायचा पण दीदींचा आवाज मंद्र सप्तकामध्ये असो, मध्य किंवा तारसप्तकात असो, क्लिअर ऐकू यायचा. ह्याचाच अर्थ त्यांच्या आवाजाचा थ्रो किती परफेक्ट आणि अचूक आहे, हे मला प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले...

दीदींच्या एका प्रोग्रॅमच्या वेळेस त्यांनी 'दीनायन' हे कॅलेंडर प्रसिद्ध केले होते, ज्यामध्ये दीनानाथ मंगेशकरांच्या नाटकांमधली त्यांची गायलेली नाट्यपदे व नाट्यगीते व त्या त्या पात्राच्या रूपातले दीनानाथांचे फोटो, असे कॅलेंडर होते.

मला ते कॅलेंडर दीदींच्या सही सकट मिळालेले आहे. इतकी खुश झाले होते मी. मला साक्षात गानकोकिळेच्या हस्ताक्षरातले, कु. अबोली असे लिहिलेले आणि मग त्यावर बाळासाहेबांची आणि दीदींची स्वाक्षरी केलेले असे ते कॅलेंडर माझ्यासाठी फारच मोलाचा ठेवा आहे.

त्याचप्रमाणे 'लता गंधसुगंध' अशा नावाचे अत्तर दीदींच्या नावाने काढले होते. त्याचीसुद्धा मला एक कुपी मिळाली होती! माझ्यासाठी या दोन अनमोल ठेवीच आहेत!

दीदींची स्मरणशक्ती अतिशय वाखाणण्याजोगी आहे. अनिलजींमुळे दीदींना हे ऐकून माहीत होते की मला बरीच जुनी गाणी माहीत असतात, अगदी शब्द तोंडपाठ असतात. हैदराबाद येथे दीदींच्या कार्यक्रमासाठी आम्ही गेलो होतो तेव्हा त्यांनी अचानक मला शोच्या आधी बोलावणे पाठवले... मी जरा घाबरलेच.. की का बरे बोलावले असेल... तिथे दीदी, हृदयनाथजी आणि अनिलजी होते. दीदींनी एक गाणे विचारले, आवारा... ए मेरे दिल... जाने कहां है तेरी मंझिल, ह्या गाण्याचा अंतरा आठवतो आहे का तुम्हाला? मी पण आश्चर्यचकितच झाले की मला का बरे असे विचारात आहेत. त्या म्हणाल्या, अनिलकडून कळले की तुम्हाला बरीच जुनी गाणी पाठ असतात, आम्ही सर्व ह्या गाण्याचा अंतरा शोधत होतो म्हणून मी म्हटले की ती उंच मुलगी आहे ना तिला विचारू या, म्हणून तुम्हाला बोलावले! मला जेवढा आठवत होता तेवढा मी सांगितला त्या गाण्याचा अंतरा शेवटी त्या प्रोग्रॅमला ते गाणे घेतले नाही, पण मला खूप आनंद झाला होता की दीदींनी अनिलजींकडून नुसते ऐकूनसुद्धा माझे नाव आवर्जून लक्षात ठेवून मला बोलावून विचारले

आता परत पहिल्या शोबद्दल सांगते. शोच्या आदल्या दिवशी ग्रँड रिहर्सल होती. अंधेरी स्पोर्टस क्लबला अखेर शोचा दिवस उजाडला. प्रोग्रॅम सुरू झाला. नेहमीप्रमाणेच दीदी अतिशय विनम्रपणे हात जोडून थोड्याशा वाकून सर्वांना अभिवादन करतंच स्टेजवर आल्या.

ईशस्तवन झाल्यावर 'अजीब दास्तान है ये' हे गाणे पहिले होते. आमचे कोरस असलेले.. इंट्रो म्युझिक वाजले. आधीचा WESTERN STYLE CHOIR CHORUS गायलो.. व्हायोलिननंतर दीदींनी सुरुवात केली, 'अजीब दास्तान हैं ये' ज्याच्यानंतर आमचा कोरस होता आणि स्टेजवर त्यांचा माइकवरून आवाज इतका रसाळ, मधाळ गोड ऐकू आला की मी... मीच ती, वेडी... कुठे उभी आहे ह्याचे भान हरपून नकळत... जणू काही मंत्रमुग्ध झाल्यासारखी. माईककडे पाठ करून... दीदींकडे तोंड करून ऐकतच उभी राहिले. इकडे दुसरी लाइन गायल्यापण दीदी, 'कहां शुरु कहां खतम' तरी माझे तोंड दीदींकडेच... आमच्या माईकच्या एकीने मला हाताने खांद्याला धरून... माईककडे फिरवले. आणि नुसते खुणेनेच दर्शवले, इथे गायचेय आपल्याला! तेव्हा कुठे मी भानावर आले. नाहीतर गेले होते परत. कुठल्यातरी जगात... असा स्वर्गीय सूर ऐकल्यावर... म्हणजे जणू काही, मी न माझी राहिले असेच काहीसे झाले होते माझे.

मग... नुसता विचार करा की... संगीतकार, वादक, प्रोड्युसर, डायरेक्टर, रेकॉर्डिस्ट, ही लोके किती खुश आणि वेडी होत असतील त्याचे गाणे असे समोर ऐकू आल्यावर. त्याचा अनुभव... आनंद... वर्णनापलीकडचाच असणार.....

६ फेब्रुवारी २०२२ हा सर्व भारतवासीयांच्या दृष्टीने संगीत जगतातील अतिशय अशुभ दिवस, कारण ह्या दिवशी दीदी स्वर्गलोकी विराजमान झाल्या. आपण सर्व संगीतप्रेमींना जणू काही आपली स्वतःची माताच आपल्याला सोडून गेल्यासारखी जाणवतेय. पण खरं सांगू, त्यांची 'जयंती' म्हणायला माझे मन आजही मान्य करत नाही. कारण जोपर्यंत आकाशात सूर्य, चंद्र आहेत आणि ह्या भूतलावर शेवटचा भारतीय माणूस अस्तित्वात आहे तोपर्यंत लतादीदी ह्या आपल्यात कायम आहेत आणि कायमच अजरामर राहणार. तर अशा लतादीदींना येत्या २८ सप्टेंबर रोजी येणाऱ्या वाढदिवसाच्या अनेक शुभेच्छा.

Happy Birthday Lata Didi!

**– अबोली ठोसर**
antdmbvli@yahoo.com

## 'ध्यास जीवनाचा' शिल्पकार सदाशिव साठे यांचा जीवनप्रवास

जागतिक कीर्तीचे शिल्पकार सदाशिव साठे यांच्या 'ध्यास जीवनाचा' या आत्मकथनाचे प्रकाशन १५ ऑगस्ट रोजी व्यंगचित्रकार, कलेचे उत्तम जाणकार आणि एक नामवंत राजकीय व्यक्तिमत्त्व राज ठाकरे यांच्या हस्ते मुंबईतल्या नेहरू सेंटर येथे झाले. हा प्रकाशन समारंभ सदाशिव साठे स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालीतर्फे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी ख्यातनाम चित्रकार सुहास बहुळकर, प्रसिद्ध चित्रपट निर्माते-दिग्दर्शक रवी जाधव विशेष अतिथी म्हणून आणि ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, सदाशिव साठे यांचे चिरंजीव श्रीरंग साठे, पुस्तकाचे सहलेखक सतीश कान्हेरे व्यासपीठावर उपस्थित होते.

हा ध्यास जीवनाचा या शिल्पगंधर्व सदाशिव साठे यांच्या आत्मकथनाचे सहलेखन आणि शब्दांकन सतीश कान्हेरे यांनी केले असून जेष्ठ पत्रकार सुधीरजी जोगळेकर यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे.

भाऊंची शिल्पकला बघत आणि ऐकत आम्ही लहानाचे मोठे झालो आहोत. चित्रकार, व्यंगचित्रकार आम्ही कागदावर चित्र काढतो पण शिल्पकार चिकणमातीच्या गोळ्यातून नको असणारा भाग काढून शिल्प सकारात असतो. त्या गोळ्यात जे शिल्प दडलेले असते ते दिसावे लागते. हे दिसणे जे आहे तीच मोठी विलक्षण गोष्ट असते. असे प्रतिपादन पुस्तक प्रकाशन समारंभात राज ठाकरे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीरंग साठे यांनी केले. ते म्हणाले, माझे वडील अभिजात कलावंत होते. माझा मित्र आणि प्रतिभावान लेखक सतीश कान्हेरे यांनी या पुस्तकाच्या सहलेखनाची जबाबदारी उत्तमप्रकारे पार पाडली आहे. त्याचबरोबर ज्येष्ठ कवयित्री उषा मेहता यांच्या प्रेरणेने आणि त्यांच्या सहकार्यामुळेच हे पुस्तक प्रत्यक्षात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

सतीश कान्हेरे या पुस्तक लेखनाच्या प्रवासाबद्दल आणि सदाशिवराव साठे यांच्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रसिद्ध चित्रपटनिर्माते आणि दिग्दर्शक रवी जाधव यांनी भाऊंच्या कलेविषयी आणि त्यांच्या ध्यासाविषयी अतिशय आदराची भावना असल्याचे सांगितले. डोंबिवली एमआयडीसीमधल्या केमिकल झोनमध्ये भाऊंचे अतिशय सुंदर असे कलादालन आहे. सर्व केमिकल कंपन्यांच्या गराड्यात शिल्पकलेतल्या कार्याचे अतिशय सुंदर असे जणू एक सरोवरच आहे. हे पुस्तक सर्वांनी आवर्जून वाचावे आणि कालादालनही जरूर पाहावे म्हणजे भाऊंच्या कार्याची महती सर्वांना निश्चितपणे जाणवेल असे ते म्हणाले.

आपला सारा आयुष्यभराचा प्रवास भाऊराव साठे अतिशय मोकळेपणाने सतीश कान्हेरे यांच्याशी बोलले असून त्यांनी चांगल्या प्रकारे ते शब्दबद्ध केले आहे. जणू काही भाऊच आपल्याशी बोलताहेत इतक्या समर्पकपणे या पुस्तकाचे लेखन झाले आहे असे मत ख्यातनाम चित्रकार आणि चित्रसमीक्षक सुहास बहुळकर यांनी व्यक्त केले. सरकारने ही पुस्तके विकत घेऊन सर्व कला महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावीत अशी सूचनाही त्यांनी या प्रसंगी केली.

ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांनी आपले विचार व्यक्त करताना या अभिजात कलेचा वारसा जपणाऱ्या आणि शिल्पकार म्हणून फार मोठे योगदान देणाऱ्या सदाशिवराव साठे यांच्या कार्याचा गौरव पद्म पुरस्कार देऊन करायला हवा होता. पण एकूणच अनास्था इतकी आहे की पद्म पुरस्कार तर सोडाच, त्यांनी साकारलेल्या शिल्पांचे एखादे स्मारक कल्याण या त्यांच्या कर्मभूमीत उभारावे असे स्थानिक प्रशासनालाही वाटले नाही आणि सुचलेही नाही, अशी खंत बोलून दाखवली.

कार्यक्रमाचं सूत्रसंचालन धनश्री दामले यांनी केलं.

●

---

## राजा जाधव यांचे 'दादर ते दादर' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

नालासोपारातील दलितमित्र राजा जाधव यांच्या 'दादर ते दादर' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन आमदार कालिदास कोळंबकर आणि प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ, लोकमान्य टिळक सायन रुग्णालयाच्या माजी डीन डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. १७ ऑगस्ट रोजी ग्रंथालीतर्फे प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे लेखन दादासाहेब दापोलीकर यांनी केले आहे. राजाभाऊ जाधव यांनी वसई, नालासोपारा परिसरात केलेल्या समाजसेवेचा अनेक वक्त्यांनी आपल्या भाषणात यावेळी उल्लेख केला. राजाभाऊंचे आप्त व मित्र यांनी राजाभाऊंच्या जडणघडणीविषयी भावना व्यक्त करून, त्यांच्या सामाजिक जाणिवेचा आदराने उल्लेख केला.

प्रतिथयश लेखक सुमेध वडावाला (रिसबूड) यांनी पुस्तकाच्या चरित्रनायकाच्या आयुष्यातील काही उल्लेखनीय घटनांचा आढावा घेतला. राजाभाऊ हे कर्तृत्व, वक्तृत्व आणि दातृत्व यांचा जणू त्रिवेणी संगमच आहेत, असे ते म्हणाले.

दादासाहेब दापोलीकरांनी या पुस्तकनिर्मितीमागील भूमिका विशद केली. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात हे पुस्तक प्रकाशित होत आहे, याबद्दल आनंद व्यक्त केला.

●

## मोहन काळे लिखित 'एकदा आपणच व्हावे मोर' कवितासंग्रहाचे प्रकाशन

ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या रेगे सभागृहात नुकतेच कवी मोहन काळे यांच्या 'एकदा आपणच व्हावे मोर' या तिसऱ्या बालकवितासंग्रहाचे प्रकाशन कविवर्य अरुण म्हात्रे आणि बेडेकर विद्यालयाच्या तेरा विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते उत्साहात पार पडले.

यावेळी बोलताना ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी 'मोहन काळे हे घोडेगावचे. हा जो जुन्नर, आळेफाटाचा परिसर आहे. या परिसरात बालकविता जोमाने फुलली. देवा तुझे किती सुंदर आकाश, फुलांवर उडते फुलपाखरू अशा कविता लिहिणारे ग.ह. पाटील येथलेच. शांताबाई शेळके यांचेही वास्तव्य या परिसरात काही काळ होते. लेखक-वाचक संवाद होणे महत्त्वाचे आहे. 'ग्रंथाली'ने नेहमीच याला प्रोत्साहन दिले', असे प्रतिपादन केले.

प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता हनमघर याही प्रकाशनावेळी मंचावर उपस्थित होत्या. त्यांनी वाचनाचे महत्त्व विशद करून सतत आनंदी राहण्याचे आवाहन केले.

ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांनी लंडनहून मोहन काळे यांना खास संदेश पाठवून त्यांच्या वाटचालीला शुभेच्छा दिल्या.

मुसळधार पावसाची संततधार सुरू असतानाही रसिकांनी या प्रकाशन समारंभास उत्स्फूर्त हजेरी लावली. या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालिका डॉ. लतिका भानुशाली यांनी सुरुवातीला आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या बालकांसाठी लेखन करत असलेल्या आणि त्यांच्या भावविश्वात डोकावणाऱ्या लेखकांचा सुबोध परिचय करून दिला. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली या पुढील उद्दिष्टे कथन करून मोहन काळे यांच्या कवितांचे कौतुक केले. त्यांचे पुढील पुस्तकही आम्हीच प्रकाशित करू असे आश्वासन दिले.

कवी मोहन काळे आपल्या मनोगतात म्हणाले, की चांगली पुस्तके दूर गेलेल्या वाचकांना पुन्हा पुस्तकाकडे खेचून आणतीलच.

'एकदा आपणच व्हावे मोर' या पुस्तकाला प्रस्तावना लिहिणारे कवी संदेश ढगे यांनी मोहन काळे यांचे कौतुक करताना सांगितले, की या समृद्ध परंपरेचा वारसा मोहन यांनी निगुतीने सांभाळला आहे. रंजनाबरोबर मोहनच्या कवितेत एक भाषेची शिकवण आहे. याप्रसंगी या पुस्तकातील चित्रे रेखाटणारे सुप्रसिद्ध चित्रकार पुंडलिक वझे यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. वझे यांच्या चित्रांनी यातील कवितांना पुरेपूर न्याय दिलाय, त्यामुळे बालवाचकांना पुस्तकाची गोडी अधिकच लागेल, असे उद्गार त्यांनी काढले.


बालकवितांचे वाचन-गायनाचे हजारो प्रयोग करणारे कवी रमेश तांबे यांनी त्यांच्या कवितांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कवी-कथाकार किरण येले यांनी मोहनला शुभेच्छा देताना सांगितले, की आपली मराठी कविता संस्कार करण्यास अतिशय सक्षम आहे. बालवाचकांची चळवळ, त्याचे सामाजिक भान, आपले नागरिक म्हणून योगदान यावर त्यांनी परखड भाष्य केले.

डॉ. लतिका भानुशाली यांच्या अभ्यासपूर्ण निवेदनाने कार्यक्रमाची उंची गाठली.

•

॥ग्रंथाली॥




**एकदा आपणच व्हावे मोर**

**मोहन काळे**

**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ८० रुपये**

**बे दुणे पाच!**

**सारिका कुलकर्णी**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

# सारिका कुलकर्णी लिखित 'बे दुणे पाच' पुस्तकाचे प्रकाशन




**पुस्तकप्रकाशनसमयी जयश्री शेळके, शालिनी चाटुफळे, लेखिका सारिक चाटुफळे-कुलकर्णी, दासू वैद्य, सतीश कुलकर्णी आणि दीपक पवार**

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने, १० ऑगस्ट २०२४ रोजी, सारिका कुलकर्णी लिखित 'बे दुणे पाच' या पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी प्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक गजेंद्र अहिरे, प्रसिद्ध लेखक सॅबी परेरा, मार्मिक साप्ताहिकाचे संपादक मुकेश माचकर आणि ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर हे उपस्थित होते.

''एकूणच विनोदी साहित्याकडे स्त्री-पुरुष असा लिंगभेद न करता बघायला हवे. स्त्रीला स्वतःला सिद्ध करून मग लिहिते होण्यात पुष्कळ काळ जावा लागला, त्यामुळे स्त्रीला लेखनात विनोद आणण्यात पुष्कळ काळ गेला. पण, तिच्याकडे विनोदाचे अंग उत्तम असू शकते हे मंगला गोडबोले, इंद्रायणी सावकार यासारख्या स्त्रियांनी दाखवून दिले आहे. ज्यात आता सारिका कुलकर्णी हे नाव 'बे दुणे पाच'च्या रूपाने येऊ घातले आहे'' असे प्रतिपादन चंद्रकांत कुलकर्णी यांनी केले.

पुढे ते असेही म्हणाले, की ''स्त्री साहित्याकडे नेहमी एक भाबडी, निरागस अशी लेखिका, जी कविता करते, वेल्हाळ कथा करते म्हणून तरी किंवा एकदम विद्रोह करणारी, पेटून उठणारी लेखिका अशा दोन टोकांच्या भूमिकेतून बघितले जाते. नाटकाच्या चळवळीतदेखील गेल्या काही वर्षांत स्त्री नाटककार येऊ लागल्या आहेत. हा संक्रमणाचा काळ आहे. त्यामुळे लेखनाकडेदेखील आपल्याला वेगळ्या नजरेने बघावे लागेल.''

सारिका कुलकर्णी यांचे लिखाण मार्मिक आहे. ते केवळ विनोदी नाही तर त्याला एक समजुतीचा स्तर आहे. त्यांनी वेगवेगळ्या विषयांना, लोकांना भेटत आपली निरीक्षणे यापुढेदेखील लेखन स्वरूपात मांडत राहावी, असे आवाहनदेखील त्यांनी केले.

सॅबी परेरा त्यांच्या भाषणात म्हणाले, की ''सारिका कुलकर्णी यांच्या लिखाणात एक उपहास, खुमासदारपणा आहे. विडंबनात्मक काकदृष्टी आहे. विनोदी लेखनातील सारिका कुलकर्णी हे आश्वस्त करणारे नाव होऊ पाहते आहे.''

''मराठी साहित्याचा, विनोदी लिखाणाचा दुर्धर काळ चालू असताना सॅबी परेरा, सारिका कुलकर्णी ही आश्वस्त करणारी लेखकमंडळी या प्रतलात येत आहेत ही आनंदाची बाब आहे'' असे गजेंद्र अहिरे म्हणाले.

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली प्रकाशन संस्थेचा आढावा घेतला. डॉ. लतिका भानुशाली यांनी आपल्या ओघवत्या वाणीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. ॲडव्होकेट जयेश वाणी यांनी 'बे दुणे पाच' या पुस्तकातील एका लेखाचे अभिवाचन केले.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या डॉ. नांदापूरकर सभागृहात 'बे दुणे पाच' या पुस्तकाचे पुन्हा प्रकाशन झाले. त्यावेळी ''पूर्वीच्या काळात स्त्रियांना बोलण्याची मुभा नव्हती. त्या व्यक्त होऊ शकत नव्हत्या. त्या व्यक्त होऊ शकत नव्हत्या. या स्त्रिया आता बोलू लागल्या आहेत. एवढेच नव्हे, तर त्या आता आपल्या लेखनातून व्यक्त होत आहेत. ही या शतकाची मोठी देणगी आहे'', असे मत प्रसिद्ध कवी दासू वैद्य यांनी व्यक्त केले.

यावेळी अध्यक्ष म्हणून दीपक पवार, लेखिकेची आई शालिनी चाटुफळे, निवृत्त जेलअधीक्षक सतीश कुलकर्णी उपस्थित होते. दासू पुढे म्हणाले, की ''स्त्रिया विडंबनात्मक, विनोदी लेखन करत आहेत, ज्यामुळे व्यक्ती किंवा समाजाच्या मर्मावर हसत हसत बोट ठेवलं जातं, ही या शतकाची मोठी देणगी आहे.''

सचिन चाटुफळे, अजित देशपांडे आणि प्रवीण कुलकर्णी यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री शेळके यांनी केले.

●

## मोहन देशमुख लिखित ‘कृष्णाकाठावरून : सांगली ते मुंबई’ आत्मकथन प्रकाशित

मुंबई - ग्रंथाली प्रकाशित, मोहन देशमुख लिखित कृष्णाकाठावरून - सांगली ते मुंबई या आत्मचरित्राचे प्रकाशन, दादर येथील सावरकर स्मारक सभागृहातील समारंभात सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते, सुभाष देसाई, कुमार केतकर, रजनी अजमेरा, सुनील रोहोकले, जयश्री देशमुख, सुरेश देशमुख आणि सुदेश हिंगलासपूरकर यांच्या उपस्थितीत झाले.

सुशीलकुमार शिंदे यावेळी बोलताना म्हणाले, देशमुखांनी कधी चुकीचं काम केलं नाही. ते वैचारिक भूमिका घेऊन निघालेले गृहस्थ आहेत. सांगली पुढे आणणाऱ्या राजकारण, साहित्य, समाजकारण अशा विविध क्षेत्रातील साऱ्यांचं स्मरण त्यांनी पुस्तकात केलेलं आहे.

मोहन देशमुख यांची ओळख बिल्डर म्हणून करवून दिली होती तेव्हा त्यावेळी बिल्डरबद्दल समजात प्रतिमा फारशी चांगली नव्हती, मात्र देशमुख याला अपवाद होते. त्यांच्या वडिलांकडून सचोटीनं संस्कार घेऊनच मुंबईत आले होते. ते संवेदशील मनाचे आहेत. आज पंचाहत्तरीत ते शरीरानं तंदुरुस्त आहेत, त्याचबरोबर मनानंही विशुद्ध आहेत, यामागे त्यांचा प्रसन्न, शांत, समतोलपणा आहे, असे मनोगत सुभाष देसाई यांनी व्यक्त केले.

मोहन देशमुख यांनी लेखक म्हणून मनोगत व्यक्त केले.

यावेळी बोलताना कुमार केतकर म्हणाले, मोहन देशमुख यांनी युवक बिरादरीशी ठेवलेलं नातं महत्त्वाचं आहे. सुनील देशमुख अमेरिकेत स्थायिक झाले, अब्जाधीश झाले. यांनी गरजूंच्या उत्कर्षासाठी पैसे वापरले. त्यांच्याशी देशमुखांचे ऋणानुबंध जुळले त्यात हे सामाजिक भान अधिक होतं. मोठ्या वर्तुळात वावरूनही मोहन देशमुख यांचं सामान्य माणसाशी नातं कायम आहे. गेल्या पंचाहत्तर वर्षांत काय प्रगती झाली, ते मोहन देशमुखांचं पुस्तक वाचलं की समजेल! सांगली तेव्हा कशी होती, महाराष्ट्र कसा होता व आता कसा आहे, या प्रगतीचा आलेख दिसेल. मोहन देशमुखांनी उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्रांत काय घडलं याचं वर्णन त्यांच्या आत्मचरित्रात आहे.

बिल्डर अजमेरा यावेळी बोलताना म्हणाले, कमी मराठी माणसं बिल्डर असण्याच्या काळात मोहनराव यांनी जे काम केलं ते प्रेरणादायी आहे. कुठल्याही नैसर्गिक आपत्तीत स्वयंस्फूर्त मदतकार्य करायला नेहमी पुढे असत. त्यांचं सामाजिक भानही आदर करावा असं आहे.

कृष्णाकाठच्या संस्कारांची शिदोरी आणि आईवडिलांची शिकवण याचं माझ्या जडणघडणीत मोठं मोल आहे. ते घेऊनच मी सामाजिक, वैचारिक भान राखून मार्गक्रमण केलं, असे सांगून त्यांनी बिल्डर व्यवसाय ते विपश्यनाकेंद्र या जीवनप्रवासाबद्दल, सामाजिक कार्याबद्दल माहिती दिली.


आरंभी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले. त्यावेळी ग्रंथालीतर्फे मोहन देशमुख यांचा पंचाहत्तरीनिमित्त, ग्रंथालीचे संस्थापक-सदस्य कुमार केतकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता गव्हाणकर यांनी केले.

●


॥ग्रंथाली॥

**प्रवरेचा दाता**





**दादासाहेब रूपवते**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**

**कृष्णाकाठवरून**
**सांगली ते मुंबई**

**मोहन देशमुख**




**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**

# सेरिब्रल पाल्सी या विषयावर रेखा विजयकर यांचे मार्गदर्शन




**रेखा विजयकर यांच्याशी संवाद साधताना सुधा तुंबे**

'खरं तर प्रत्येक व्यक्तीत काही ना काही अक्षमता असतेच. तेव्हा दिव्यांग व विशेष व्यक्तींकडे वेगळ्या दृष्टीने न पाहता, त्यांच्याकडे असलेल्या क्षमतांचा विचार करून त्यांची जडणघडण व्हायला हवी. तुम्हाला सुरात गाता येत नसेल पण एवढ्या मोठ्या कीबोर्डवर एखादा तरी सूर तुमचा असतो. त्याप्रमाणे काय नाही आहे याचा विचार न करता; काय आहे याचा विचार करून आयुष्य जगायला हवे.' असे अडॅप्ट (ADPT) संस्थेच्या संशोधन विभाग, प्रशिक्षण विभाग व अध्यापनशास्त्राच्या वरिष्ठ संचालक रेखा विजयकर ग्रंथाली प्रतिभांगण येथे आयोजित 'काहीतरी विशेष' कार्यक्रमात म्हणाल्या. लेखिका सुधा तुंबे यांच्या संकल्पनेतून दिव्यांग व विशेष व्यक्ती यांच्या समस्या व उपाययोजना यावर मार्गदर्शन करणारा 'काही तरी विशेष' हा मुलाखतीचा कार्यक्रम दर महिन्याला ग्रंथालीच्या वांद्रे येथील प्रतिभांगण या वास्तूत होत असतो. आतापर्यंत या कार्यक्रमातून त्या त्या विषयातील तज्ज्ञांनी 'कर्णबधिरता', 'दृष्टिदोष' व 'अध्ययनअक्षमता' या विषयांवर प्रकाशझोत टाकला आहे. शुक्रवार ९ ऑगस्ट २०२४ रोजी या कार्यक्रमात 'सेरिब्रल पाल्सी' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी रेखा विजयकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. रेखा विजयकर या अडॅप्ट या संस्थेच्या संचालक आहेत, त्याचबरोबर त्या मुंबईतील गुरू हरकृष्ण शाळेच्या माजी मुख्याध्यापकादेखील आहेत. ज्या काळात सर्वसमावेशक शैक्षणिक धोरण आलेसुद्धा नव्हते, अशा काळात सर्वसमावेशक शिक्षण आपल्या शाळेतून राबवणाऱ्या त्या पहिल्या मुख्याध्यापक आहेत. सुधा तुंबे यांनी रेखा विजयकर यांना सहजसुंदर शैलीत प्रश्न विचारत बोलते केले.

रेखा विजयकर यांच्या मुलाखतीतून सेरिब्रल पाल्सी म्हणजे काय, विशेष मुलांना शिक्षण देत असताना शिक्षक-पालकांचा दृष्टिकोन कसा हवा, अडॅप्ट या संस्थेचे कार्य असे विविध पैलू उलगडत गेले. कायदेशीररीत्या शासनाने दिव्यांग व विशेष व्यक्तीसाठी विविध कायदे व तरतुदी केलेल्या आहेत, पण त्या तरतुदी त्या व्यक्तींपर्यंत पोचतच नाही, असे रेखाताई परखडपणे मुलाखतीत म्हणाल्या. मुलाखतीच्या ओघात रेखाताईंनी दिव्यांग व विशेष व्यक्तींच्या सांगितलेल्या सक्सेस स्टोरीज प्रेरणा देणाऱ्या होत्या. 'एक शिक्षक म्हणून काम करताना, शिक्षकाचे काम केवळ खडू आणि फळा यापुरते मर्यादित नाही, याची जाणीव पालक-विद्यार्थी यांच्याशी झालेल्या संवादातून झाली आणि मग मी सामाजिक कार्याकडे वळले.' असे प्रांजळपणे सांगणाऱ्या निखळ मनाच्या रेखाताईंचा सहजसंवाद प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श करणारा होता. रेखा विजयकर यांची मुलाखत आपल्याला लवकरच ग्रंथाली-प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

**वृत्तांतलेखन : अश्विनी भोईर**
कार्यक्रम समन्वयक,
ग्रंथाली-प्रतिभांगण

## ऐल तटावर पैल तटावर – कविता विशेष भाग २




**कविता भाग २ सादर करताना सुनंदा भोसेकर आणि राणी दुर्वे**

ग्रंथाली-प्रतिभांगण प्रस्तुत 'ऐल तटावर पैल तटावर' या कार्यक्रमाच्या पाचव्या भागात कवयित्री सुनंदा भोसेकर व लेखिका राणी दुर्वे यांनी ३० ऑगस्ट २०२४ रोजी कविता विशेष दुसरा भाग सादर केला. मन्या ओक या साठोत्तरी एका महत्त्वाच्या कवीच्या 'थोडासा शुभ्र गलबला बगळा उडून जाताना' या रचनेच्या दृष्टीने आगळ्यावेगळ्या कवितेने सुरुवात करण्यात आली. 'कवितेचे वर्गीकरण न करता, म्हणजे स्त्रीवादी, दलित, ग्रामीण इत्यादी भेद न करता, कविता म्हणजे मूलत: कविताच या विचाराच्या गाभ्याशी राहून आम्ही कवितेचा विचार करत आहोत.' असे राणी दुर्वे म्हणाल्या. नव्वदोत्तरी कवी व सध्याच्या कवींपासून, पुन्हा मागे जाऊन शरच्चंद्र मुक्तिबोध इतका कवितेचा व्यापक अवकाश प्रस्तुत कार्यक्रमातून राणी व सुनंदा यांनी मांडला. सलील वाघ, संजीव खांडेकर, सचिन केतकर, ज्ञानदा, मीनाक्षी पाटील आदी नव्वदोत्तरी कवी व कवयित्रींच्या कवितांचे वैशिष्ट्य सांगताना सुनंदा भोसेकर म्हणाल्या, की नात्यांबाबत कोरडेपणा आलेली व स्वीकारणारी, उपहास-उपरोध, विडंबन, गंभीर विषयांची अपारंपरिक मांडणी, मुद्दाम ठरवून केलेली, क्वचित धक्कादायक मांडणी, खुलेपणा किंबहुना कुणाचाच मुलाहिजा न ठेवणारा बिनधास्तपणा, तरीही हळूच जुन्याच कवितांशी नाळ जोडणारी कविता, असेच या कवितेचे वर्णन करावे लागेल. अशी मांडणी करून वज्रेश सोळंकी यांची 'जाफर आणि मी' ही माणूसकेंद्री कविता प्रभावीपणे सादर करण्यात आली. गणेश विसपुते, प्रफुल्ल शिलेदार, दिनकर मनवर आदी कवींच्या कविता सादर करण्यात आल्या. आताच्या पिढीतील संकेत म्हात्रे, आदित्य दवणे, गीतेश शिंदे यांच्या कवितेची दखल कार्यक्रमातून घेण्यात आली. अशोक नायगावकर यांची 'शरणागती', महेश केळुस्कर यांची 'जहरमाया', निरंजन उजगरेंची 'सामान', अरुण म्हात्रेंची 'ते दिवस आता कुठे', उत्तम कोळगावकरांची 'जंगलतोड' या कवितांचे उत्तम सादरीकरण केले. इंद्रजित भालेराव, प्रकाश होळकर, श्रीकांत देशमुख, नीरजा, प्रज्ञा पवार, रजनी परुळेकर आदी कवी व कवयित्रींच्या कवितांनी कार्यक्रमात रंग भरले. कार्यक्रमाचा समारोप आधुनिक कवितेची बीजे पेरणाऱ्या केशवसुत यांच्या 'आम्ही काय म्हणुनी काय पुससी?' या कवितेच्या सादरीकरणाने करण्यात आला.

लवकरच हा कार्यक्रम ग्रंथाली-प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

**– अश्विनी भोईर**
कार्यक्रम समन्वयक, ग्रंथाली प्रतिभांगण


॥ग्रंथाली॥




**अनात्म**

**लिना संखे**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**



# ग्रंथपरिचय




डॉ. निर्मोही फडके
९९२०१ ४६७११


**तिच्या सेल्फी तो दिसत नाही**
**डॉ. संतोष देशमुख**




सध्याचं जग सेल, सेलफोन आणि सेल्फीचं आहे. तंत्रज्ञानानं सेल्फीची सोय केली म्हणून प्रत्येक जण अंतर्मुख झाला, असं मात्र घडलंय का? विशेष करून 'ती'चा सेल्फी कसा आहे? संवेदनशील मनाला आणि लेखणीला अस्वस्थ करणारा हा प्रश्न. ह्याच प्रश्नाचा वेध घेत आहेत काही वर्तमानकालीन लेखनकृती. कवी संतोष देशमुख ह्यांच्या 'तिच्या सेल्फीत तो दिसत नाही' ह्या कवितासंग्रहातल्या कविता (साक्षी प्रकाशन) हा शोध घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

स्त्री हा केंद्रबिंदू असलेल्या ह्या ५० कविता म्हणजे स्त्रीच्या तनामनाचा घेतलेला एक भावपूर्ण वेध आहे. आजपर्यंत ह्या विषयाबद्दल अगणित कविता लिहिल्या गेल्या असल्या तरी 'माणूसपणा'च्या जाणिवेला 'ओ' देणाऱ्या प्रत्येक कवीच्या लेखणीवर

स्त्री हा विषय गारूड घालतोच. मुद्दा असतो तो त्या कवितेला असलेल्या 'आत्मस्वरा'चा.

'तिच्या सेल्फीत तो दिसत नाही' ह्या कवितासंग्रहातल्या कविता आपला एक वेगळा स्वर घेऊन आल्या आहेत. हा स्वर वेदनेचा आहे.

तिच्या कानशिळावर/ उमटलेली ठसठशीत बोटं,/ माझ्या काळजावर/ न दिसणारे फणफणणारे व्रण.../ तशा ती आणि मी सारख्याच/... बाजारात तिनं विकली जांभळं-बोरं/ आणि मी हिंडले दारोदार/ संचित तळहातावर घेऊन/(संचित)

किंवा

ती गुंतवत नाही कुठेच मन/ पाहत नाही कोणतेच चित्र-विचित्र/ ऐकत नाही काहीच वेडं-वाकडं/ घेतही नाही चव/ जिभेला चांगली वाटणारी.../... तिला कळून चुकलं आहे/ शापित आयुष्य लाभलं आहे आपल्याला/ अशा शापित आयुष्यापुढे/ अगदी अहिल्याही खुजी वाटावी/(शिळा)

अहिल्येच्या संदर्भासारखे अनेक संदर्भ घेत, रूपकांच्या माध्यमातून ही कविता स्त्रीत्वाचा अनादि काळ वाहत आलेला प्रवाह वाचकाच्या मनात झिरपवते. अर्थात कवितेच्या वाचकाला आवश्यक असलेली अट इथेही लागू होते, ती म्हणजे वाचकाच्या अंतर्मनाची जमीन 'झिलाण' असल्याची... आर्द्र असल्याची. ती अट पूर्ण असेल तर ह्या कवितेतल्या 'यशोधरे'ची कथा आपल्याला उमजते आणि अशाच कुणा 'ती'ला उपभोगून त्यानं दुसऱ्या पुरुषाच्या हवाली केलेल्या 'ती'ची व्यथाही समजते.

स्त्रीचं अवघं असतेपण-नसतेपण शब्दांमध्ये गोवणारी ही कविता 'आई' ह्या तत्त्वाला स्पर्श केल्याशिवाय कशी राहील? आईबद्दल कवी लिहितात, आई असतो झोका,/ स्वतःला बांधून घेत/ लेकराला आकाशापर्यंत घेऊन जाणारा/ आई असतो विश्वास/ दोन श्वासांतील अंतरासारखा/(आई)

स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या ह्या कवितांमध्ये सामाजिक आशयाचा एक दीर्घ प्रस्तर दिसून येतो. कवीच्या दृष्टीनं केलेलं सामाजिक पर्यावरणाचं निरीक्षण हे ह्या कवितांमधून कधी स्पष्ट, परखडपणे समोर येतं, तर कधी काही रूपक-प्रतिमांमधून धूसरपणे दिसतं. स्त्रीला घर सोडावं लागतं, का? ह्यामागे अनेक कारणं असतील, पण पुरुष घर सोडून गेल्याच्या घटना तुलनेनं कमीच. म्हणजे पायाखालची जमीन आणि माथ्यावरचं छप्पर आजही तिच्या मालकीचं नसतं, ना माहेरचं, ना सासरचं.

समाजानं शतकानुशतकांपासून ठरवलेले हे निकष. ही सामाजिक परिस्थिती कितीतरी स्त्रियांच्या बाबतीत जीवघेणी ठरते, तर काही जणींच्या बाबतीत निरभ्र आकाश घेऊन येते.

घर सोडताना/ मी/ ठोकरल्या/ उंबऱ्यावरच्या अक्षता/ सुखाची/ खोटी स्वप्ने दाखवून/ फसवणाऱ्या.../ (घर सोडताना)

किंवा

आज मात्र मला/काहीच करायचं नाही/ कळसूत्री बाहुलीप्रमाणे नाचत राहायचं आहे/ बाया सांगतील तसं/...अडखळत्या पावलांनी मी पिंडाजवळ जाते/ आणि दाखवते त्यानं केलेल्या जखमा/ पदर जरासा बाजूला करून/ तत्क्षणी पांढऱ्याशुभ्र पिंडात/ क्रूरपणे हसणारा त्याचा/ बीभत्स काळा चेहरा दिसतो/ आणि पिंडावरील कावळ्यांची काव काव/ मला मुक्त करून जाते कायमची.../ (मुक्ती)

काही कविता काही ठिकाणी विनाकारण स्पष्टीकरणात्मक वाटतात. मात्र काही कवितांमधली दृश्यात्मकता आपल्याला आकर्षित करते.

ह्या कवितासंग्रहाच्या 'ब्लर्ब'मध्ये प्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक प्रा. डॉ. महेश खरात ह्या कवितेविषयी लिहितात, 'स्त्रीच्या भावविश्वाची दुखरी वेदना प्रकट करणारी एक अस्सल कविता', हे सगळ्या कविता वाचल्यावर पटते.

सध्याच्या भोवतालात, एकूणच अतिशय गढूळ अशा वातावरणात, 'ती'च्या मोकळेपणानं तर राहू द्या, साध्या जगण्याबद्दलही ज्वलंत प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा वेळी स्त्रीच्या कथा-व्यथा ह्यांना मुखरित करणाऱ्या ह्या कविता अधिकाधिक संवेदनशील माणसांपर्यंत पोहोचणं गरजेचं आहे.

ही स्त्रियांच्या दुःखाची उजळणी नव्हे, तर स्त्रीत्वाच्या आणि माणूसपणाच्या शब्द-संवेदनेची उजळण आहे.

कोसळ अशी/ अभ्रातून वीज निसटावी तशी/ दे उजळून हा इहलोक सारा/माझ्या जीवनाशी समरस असणारा.../(ये अशी)

आधुनिक म्हणवणाऱ्या आपल्या समाजाची मानसिकता आजही किती बुरसटलेली आहे, ह्याचे पडसाद ह्या कवितेत आहेत, जे वाचकांना विचारप्रवृत्त करतात.

मग वाचकांच्याही लक्षात येतं की, 'तिच्या सेल्फीत तो 'का' दिसत नाही?'

**तिच्या सेल्फीत तो दिसत नाही : कवी - डॉ. संतोष देशमुख**
साक्षी प्रकाशन.
मूल्य ₹१५०/-

# ग्रंथपान




**चांगदेव काळे**

**९८६९२०७४०३**


## पुरोगामी शाहू महाराज

**डॉ. शांताराम डफळ**




**प्रेरणादायी चरित्र**

महाराष्ट्रात पहिल्यांदाच बहुजनांची पहिली पिढी घडवण्यात आणि उच्च शिक्षणाने विभूषित करण्यात कोल्हापूरच्या वसतिगृहांचा मोलाचा वाटा होता. शाहूकाळानंतरदेखील बहुजन समाजाच्या तीन पिढ्या या वसतिगृहांनी घडवल्या. पश्चिम महाराष्ट्रातील बहुजन समाजाला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढण्याचे कामदेखील वसतिगृहांमुळेच झाले. मराठा सम ाजाबरोबरच बहुजन समाजाच्या मुलांच्या उत्थानासाठी या वसतिगृहांच्या चळवळीने मोठे योगदान दिले, हे एक ऐतिहासिक सत्य स्वीकारावेच लागेल.'

थोर ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तिमत्त्वाचे चरित्र लेखन करणे ही एक मोठी जोखीम आणि तितकीच प्रेरणादायी बाब असते. चरित्रलेखन करताना उणेपण येणार नाही याची काळजी लेखकाला/चरित्रकाराला घ्यावी लागते. अशी काळजी घेतलेले चरित्र म्हणजे 'पुरोगामी शाहू महाराज' हे होय.

डॉक्टर शांताराम डफळ यांनी शाहू महाराजांच्या कर्तृत्वाचा ओघवता आलेख या पुस्तकातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. शाहू महाराज हे पुरोगामी म्हणून ओळखले जातात यामागे त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा आहे आणि तो पुढे निरंतर राहणार आहे. ही पुरोगामीत्वाची चळवळ महात्मा ज्योतिराव फुले यांनी सुरू केली ती एक नेता म्हणून परंतु शाहू महाराज हे स्वतः एक सुराज्यकर्ते होते आणि राज्यकर्त्यांनी केलेले पुरोगामी कार्य हे विशेषत्वाने लक्षात घ्यायला हवे. डॉक्टर शांताराम यांनी शाहू महाराजांच्या कर्तृत्वाचा आढावा घेताना एकेक पैलू उलगडून दाखवलेला आहे. हा काळ इंग्रजांच्या सत्तेचा होता आणि कोल्हापूर संस्थान हे इंग्रजांचे मांडलिक होते. असे असतानादेखील आपल्याला जे करायचे आहे ते करायचेच आणि त्याच वेळी इंग्रजांची मर्जीदेखील दुखवायची नाही, अशा दोन टोकांना हाताशी धरून त्यांनी केलेले कार्य अगदी चोखपणे मांडण्याचे कौशल्य डॉक्टर शांताराम यांनी दाखवलेले आहे.

शाहू महाराज यांचे एकूण आयुष्य अवघे ४८ वर्षांचे. त्यापैकी त्यांचा कर्तृत्वकाळ दोन एप्रिल १८९४ ते सहा मे १९२२, म्हणजेच २८ वर्षांचा. या कालावधीत त्यांनी जे कार्य केलेले आहे ते प्रामुख्याने जातिभेदाला, विषमतेला दूर करण्याचे, शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला आणि उत्पन्नाच्या दृष्टीनेदेखील दारिद्र्यात खितपत पडलेला बहुजन समाज, त्या परिस्थितीतून बाहेर काढण्याचे मोठे आणि अवघड काम महाराजांनी केलेले आहे. त्यासाठी प्रथम शिक्षणाचे द्वार सगळ्यांसाठी मुक्त केले. शैक्षणिक संस्था स्थापन करून केवळ काम पूर्ण होत नाही तर त्यासाठी वसतिगृहांची सोय करणे आवश्यक आहे, हे लक्षात येताच अशा वसतिगृहांची उभारणी केली आणि त्यातून मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची एक क्रांती आणि चळवळ उभी राहिली. यात स्त्रीशिक्षणाच्या आणि मुस्लीम समाजाच्या शिक्षणाच्या दृष्टिकोनातूनही पावले उचललेली आहेत. याविषयी लेखक लिहितात, 'महाराजांनी रयतेच्या लेकरांच्या शिक्षणाची मोफत सोय केली. प्रजेच्या कल्याणाची खरी तळमळ राज्यकर्त्यांना असेल तर निधी कधीच कमी पडत नाही हे महाराजांनी कोल्हापुरात आपल्या कृतीने सिद्ध करून दाखवले. शेतीक्षेत्रासाठी त्यांनी केलेल्या कामाचीसुद्धा आवर्जून नोंद घ्यायला हवी. राधानगरी धरण व राधानगरी गाव ही त्यांच्याच कर्तृत्वाची साक्ष आहे. उद्योगक्षेत्राला त्यांनी दिलेली चालना, त्यासाठी निवडलेले विविध उद्योग आणि व्यापारपेठा, यामुळे कोल्हापूर एक स्वयंपूर्ण असे संस्थान दिसून येते. याबाबत लेखक लिहितात, 'महाराजांची कल्पकता, प्रयोगशीलता, दूरदृष्टी, चिकाटी इत्यादी गुणांमुळेच त्यांनी कोल्हापुरास उद्योगधंद्याबाबत लौकिक मिळवून दिला.'

सत्यशोधक समाजाच्या फुल्यांच्या कार्याला तळागाळापर्यंत सर्वदूर पोहोचवण्याचे कार्य राजर्षी शाहूंनी निष्ठेने केले. असा सामाजिक कार्याचा वसा घेणारा राज्यकर्ता दुर्मिळच म्हणावा लागेल. महाराजांनी भटक्याविमुक्त जमातींचा उद्धार केला. सामाजिक न्यायासाठी लढा दिला. अस्पृश्य मुक्तीचा संग्राम सुरू केला. आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. महाराज हे एक उत्कृष्ट मल्ल होते. त्यांनी आपल्या संस्थानात मल्लविद्येचा नुसता पुरस्कार केला नाही तर तिला सन्मानदेखील मिळवून दिला. अनेक कलांचे ते भोक्ते होते. त्यांच्या काळात संगीत, नाट्यकला, चित्रकला, यासारख्या ललित कलांना राजाश्रय आणि सन्मान मिळाला.

यातून एक मोठे पुरोगामी व्यक्तिमत्व आपल्यासमोर साकार झालेले आहे.

डॉक्टर शांताराम डफळ यांनी हे चरित्र अतिशय सुटसुटीतपणे आणि नेमकेपणाने मांडण्यावर भर दिलेला आहे. महाराजांच्या काळातल्या इतिहासाचे व तारखांचे संदर्भ तसेच त्या काळात असलेले ब्रिटिश अधिकारी आणि त्यांचा अंमल, त्या काळी असलेली वर्गव्यवस्था यांना अगदी थोडक्यात परंतु सहज आकलन होईल असे आपल्यासमोर ठेवलेले आहे. यात त्यांनी युवावर्गाला नजरेसमोर ठेवलेले आहे. आपल्या मनोगतात त्यांनी ही बाब स्पष्ट केलेली आहे.

डॉक्टर डफळ हे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, बालभारती; हिंदी भाषा विषय समिती सदस्य आहेत. शिक्षकांसाठी तज्ज्ञ मार्गदर्शक व शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांचे व्याख्याते आहेत. अस्तित्व कवितासंग्रह, बायडा आणि इतर कथा, हे मराठी आणि नरेश मेहता के काव्य में प्रकृती – चित्रण हा हिंदी शोधग्रंथ प्रकाशित आहे. शिवाय हिंदी अनुवादित साहित्यही प्रकाशित आहे. त्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**बे दुणे पाच**

**सारिका कुलकर्णी**




**विनोद अगदी ऑरगॅनिक**

'बायकांचे आणि पुरुषांचे ब्युटी पार्लर याबद्दल कितीही विरोधी मत असो. आमच्या शेजारच्या मंजिरीवहिनी मात्र कोणाचंच ऐकत नाहीत. त्यांचा ब्युटी पार्लरमध्ये महिन्याचा अकाउंट आहे. कोणी त्याबद्दल त्यांना काही म्हणालं तर त्या सरळ उत्तर देतात, खटारा गाड्या जातात का कधी सर्व्हिसिंगला? चांगल्या स्थितीतील गाड्यांनाच त्याची गरज असते ना? तसंच आहे हे. आमच्यासारख्या चांगल्या दिसणाऱ्या बायकांनाच मेंटेन करण्याची गरज असते.'

'बे दुणे पाच' या सारिका कुलकर्णी लिखित लेखसंग्रहात एकूण २८ लेख आहेत. हे लेख 'मार्मिक' साप्ताहिकात यापूर्वी सदरलेखन म्हणून प्रकाशित झालेले आहेत. मात्र हे लेख आपण पुन्हा वाचतो आहोत असे जाणवण्याऐवजी आपण नव्याने ते वाचतो आहोत असाच भास होत राहतो. याचे कारण या लेखनामध्ये असलेला वैविध्यपूर्ण विषयांचा घेतलेला मनोज्ञ धांडोळा. सदरलेखनामध्ये लेखांसाठी मर्यादा असू शकते परंतु कल्पनेला आणि लेखनकौशल्याला अशी मर्यादा नसते. त्यातून झालेले लेखन हे विनोदी शैलीमध्ये उपहासाच्या अंगाने, उपरोधिक नजरेने केलेले असेल तर असे लेखन कधीही शिळे होत नाही. त्याचा प्रत्यय सदरचे लेख देतात. आपण कुठलाही लेख घेतला तरी त्याला हाच गंध सापडतो. विषयांच्या बाबतीत बोलायचे झाले तर किती साधेसहज घडणारे, दिसणारे, अनुभवास येणारे प्रसंग असतात, ज्यांच्याकडे आपण तितक्या चिकित्सकपणे पाहात नाही अथवा त्यांचे गांभीर्य लक्षात घेत नाही. परंतु लेखिकेने या प्रत्येक विषयामध्ये एक स्पार्क शोधलेला आहे आणि त्यातून त्या लेखाची कमान आकर्षक रितीने सजवण्यात त्या यशस्वी झालेल्या आहेत.

जाहिराती आकर्षक रितीने मांडल्या तर ग्राहक आपोआप त्याकडे वळतो हे प्रत्येक उत्पादकाला आणि विक्रेत्यालाही माहीत आहे. परंतु अशा जाहिरातीवर आणखी वेगवेगळ्या क्षेत्रात कशाप्रकारे वाव आहे याची उत्तम उदाहरणे लेखिकेने दिलेली आहेत. जसे, की 'ज्योतिष्याने स्कीम काढली. आजच आमच्याकडे या आणि तपासून बघा आपल्या मृत्यूची तारीख. कांबो पॅकेज घेतलं तर मृत्यूनंतरची नोंदणी आम्ही इथेच करून देतो. आणखी पाचशे रुपये भरले तर सरणावर साध्या लाकडांच्या ऐवजी चंदनाची लाकडं, अधिक ५०० भरले तर प्रेतावर घालायला सिल्कची चादर आणि निशिगंध आणि गुलाबाची फुलं.' लेखिकेची ही कल्पना भन्नाटच!

नामांकित शाळेमध्ये मुलांना प्रवेश मिळवण्यासाठी पालकांची चाललेली धडपड आणि होणारी फरपट हासुद्धा विषय तसाच मजेशीर. नर्सरीत प्रवेश न मिळालेल्या मुलाची आई उद्वेग कशी व्यक्त करते ते 'स्कूल चले हम' या लेखातून मांडलेले आहे. 'अहो, नर्सरीला प्रवेश हवा होता मुलाला. त्याकरिता प्रवेशपरीक्षा होती आणि केवढी नामांकित संस्था आहे. मुलं अभ्यासच करत नाही हल्ली. काय करणार?'

कुणाला बरे वाटत नाही असे कानावर येतात फुकटचे उपाय सांगणारे, सल्ला देणारे आणि स्वतःची बढाई मारणारे यांची तर कमतरताच नाही. मीच सलमानला चित्रपटात लॉन्च केले. मीच लताला तू चांगली गायिका होशील असा सल्ला दिला. इथपर्यंत ठीक आहे परंतु अर्थमंत्रीबाईंनी देशाच्या सल्लागारपदी मला बोलावले होते. काय झाले, की नोटबंदीचा विचार मी सांगितला होता, इथपर्यंत या बोलणाऱ्यांची मजल कशी जाते? व्हॅलेंटाईन डे साजरा करणे याच्या जोडीला चॉकलेट डे, रेड पांडा दिवस, कुकीज डे, पोलर बेअर डे, कसे साजरे करावे या विचारातच 'लोकसंख्या दिवस' कसा साजरा करता येईल ही कल्पनादेखील अफलातून!

क्रिकेटची मॅच हा एक घराघरातून चाललेला मॅचचाच प्रकार असतो. त्यातले एलबीडब्ल्यू, स्क्वेअर कट, कव्हर ड्राइव्ह, मीड ऑन लाँग लेग, असे अनेक शब्द सतत कानांवर आढळत असतात. ज्यांना या खेळाची माहिती नाही त्यांची या शब्दांच्या माऱ्या खाली होणारी घुसमट सांगता येणार नाही. परंतु उघडपणे ते मान्य करता येत नाही. यातले समाधान एकच, बातम्यांमधील नीरसपणा, राजकीय फटकेबाजी आणि टोलवाटोलवी पाहण्यापेक्षा रोहित-विराटची फटकेबाजी जास्त करमणूक करणारी वाटते.

या संग्रहातील सगळेच लेख हे विविध विषयांवर लिहिलेले आहेत. त्यांचे वाचन करत असताना लक्षात येते की लेखिकेकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी आहे. त्यामुळे विषयांची कुठेही कमतरता जाणवत नाही. मातीतही सोने पिकवण्यासारखे कुठल्याही साध्या घटनेत त्या कथानक शोधू शकतात. हीच गोष्ट लेखांच्या शीर्षकांबाबत. 'न्यू इयरस्य प्रथम मासे', 'सारे प्रवासी बसचे', 'दुज्या घरी डोकावी तो एक सुज्ञ', 'गाडीवान दादा ओ', 'अगं अगं महागाई', 'दारावर कावळा घुमतोय ग', 'तेरे झगडे मे क्या जादू है', आकर्षक आणि चपखल शीर्षके वाचताना आपोआप आपण त्या लेखाच्या अंतरंगात एकरूप होत जातो. लेखाच्या शेवटच्या समारोपात सार दडलेले असते हे विशेष!

हे सर्वच लेख तरलपणे साकारलेले आहेत. सॅबी परेरा यांच्या शब्दांत सांगायचे तर, 'सारिका कुलकर्णींच्या लेखणीतून उतरलेला विनोद हा अस्सल मध्यमवर्गीय मराठी मातीत जन्मलेला आहे. तो ओढूनताणून आणलेला नाही. तो खुलवण्यासाठी थिल्लरपणाची रासायनिक खते वापरलेली वापरली नाहीत. तो बहरण्यासाठी कीटकनाशके फवारली नाहीत. आजच्या पिढीचा शब्द वापरायचा तर त्यांचा विनोद अगदी ऑर्गनिक आहे.'

सारिका कुलकर्णी यांची मनुष्यबळ कौशल्य विकासाचे काम करणारी स्वतःची कंपनी आहे. त्यांनी काही काळ विविध भारतीवर निवेदिका म्हणून काम पाहिले आहे. लोकसत्ता, दिव्य मराठी, संचार या वृत्तपत्रांमधून त्यांचे लेखन प्रसिद्ध झालेले आहे. चौफेर, शब्दालय, हंस, आवाज, मार्मिक, मोहिनी या दिवाळी अंकांमधूनदेखील त्यांचे लेखन प्रसिद्ध झालेले आहे. महाराष्ट्रात विविध ठिकाणी त्यांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या संग्रहातील लेख आवडतील असेच आहेत. याशिवाय या लेखांना सजवण्यासाठी रेखाचित्रांचा वापर करण्यात आलेला आहे. ही रेखाचित्रे धनंजय एकबोटे यांची आहेत आणि मुखपृष्ठावर असलेले सुंदर चित्र पुंडलिक वझे यांनी साकारलेले आहे.

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

## नदी वाहते आहे

**मधुरा इंदापवार**




**'ऐलतट पैलतट'मधील मनाचा प्रवास**

''वयाचा आणि वासनेचा संबंध नसतो रे. वयानुसार शरीर विरक्त होईलही; पण मनाच्या विरक्तीचे काय? ती साधणं सहज शक्य असतं? आसक्ती असली की माणूस नकळत देहाच्या अनवट वाटेवरचा प्रवासी होतो. त्या तुझ्या बाबांना बघतात. ते गेलेत, हे विभ्रमात गुंतलेलं त्यांचं मन मानायला तयार नाही. त्यांच्या अतृप्त इच्छांची सावली कायम आपल्यावर असते आणि असणार आहे. मी तुला या आधीही सांगितले होते, पण तुला पटलं नाही.''

'नदी वाहते आहे' हा मधुरा इंदापवार यांचा कथासंग्रह नुकताच वाचनात आला. कथालेखक कथा लिहिताना आपल्या भोवतीचे वास्तव, व्यक्तीचित्रण आणि त्याच्या आत दडलेल्या अनेक भावभावनांचा विचार करीत असतो. कथा केवळ एका सूत्रावर अथवा प्रसंगावर जरी गुंफलेली असेल तरी लेखक त्याच्या मूळ केंद्राच्या किती आत उतरलेला आहे, त्याला जे सांगायचे आहे ते किती उलगडून, तपासून, सोलून पाहिलेले आहे. त्यातून साकार होणारे व्यक्तिमत्व हे वाचकाच्या मनावर कितपत ठसणारे आहे. यावर कथेचे यश अवलंबून असते. तसेच कथाकाराचे यश तपासून पाहताना त्याची समज, गुणवत्ता आणि प्रामाणिकपणा यांच्याकडे अधिक लक्ष द्यावे लागते. मधुरा यांच्या या संग्रहातील कथा वाचत असताना नेमका हेच विचार समोर होते असे नाही; परंतु या विचारांना मागे सारणे देखील शक्य नव्हते. याचे कारण त्यांचा हा पहिलाच कथासंग्रह आहे. यातला विशेष असा की, या कथा अगोदर दिवाळी अंकांमधून प्रकाशित झालेल्या आहेत आणि अशा प्रकाशित कथा या त्या अंकांच्या संपादकांच्या नजरे खालून गेलेल्या असल्याने कथा लेखकावर एक विश्वास आपोआपच निर्माण होतो. तसा तो मधुरा यांच्या बाबतीत झालेला आहे. हा विश्वास अनाथायी ठरलेला नाही हे त्यांच्या कथेने सिद्ध केले, असे मान्य करण्याला पर्याय नाही.

या संग्रहात हे एकूण सात कथा आहेत. लाट, नदी वाहते आहे, गाठ, दाह, सांजसावल्या, तृष्णा, कृष्णार्पण अशी त्यांची शीर्षके आहेत. ती अतिशय समर्पक आणि लक्ष वेधून घेणारी आहेत. वास्तविक नवोदित लेखक असेल आणि त्याचा पहिलाच संग्रह असेल तर या दीडशे पानांच्या संग्रहात किमान १२ ते १५ कथा सहज सामावल्या असत्या. परंतु मधुरा यांच्या कथा या दीर्घ स्वरूपात साकारलेल्या आहेत. याचे कारण प्रत्येक कथेच्या अंतरंगाच्या तळाशी जाऊन त्यांनी त्यातल्या व्यक्तीच्या मनाचा, भावनांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. असा प्रयत्न करताना स्वाभाविकच कथेची लांबी ऐवजी त्या कथेचा आवाका आणि पैसा सिद्ध होत जातो. तशा या कथा आहेत. या कथांमध्ये समान सूत्र नाही. तरीसुद्धा माणसाच्या मनाभोवती असलेले प्रेमाचे, वासनेचे, अतृप्ततेचे, हरवत चाललेल्या संवादाचे, नात्यातल्या हळुवारपणांचे, त्यात असलेले स्पर्श आणि स्पंदनांचे उत्कट भाव कसे उलगडून दाखवता येतील याकडे लेखिकेचा अधिक भर दिसून येतो. या कथांमधील वातावरण आणि व्यक्तिरेखा या साधारणतः ग्रामीण, मध्यमवर्गीय संस्कार यांच्या धाग्यांनी विणलेल्या दिसतात. यात व्यक्तीला व्यक्त करीत असताना भोवतालचा परिसर, त्यावेळचे वातावरण, याला जोड देण्यासाठी त्या हळुवारपणे धाग्यांचे टाके घालावे तशा त्या रंग भरत जातात. त्यामुळे कथा नाट्यरूपाने नेपथ्यासहित रंगमंचावर सादर होत आहे असे वाटत राहते.

कथालेखक कथा लिहिताना जे निवेदन करतो, ते साधारणतः प्रथम पुरुषी असते. अशावेळी स्वाभाविकपणे त्यातला पुरुष अथवा स्त्री निवेदक आपोआपच सतत नजरेसमोर उभा राहतो. मधुरा यांच्या कथांच्या बाबतीत हेच घडलेले आहे. अर्थातच त्यामुळे ही गोष्ट तितकी स्पष्ट होते की त्यांनी पाहिलेल्या अनुभव, वातावरण आणि केलेले निरीक्षण यांचा चपखलपणे उपयोग केलेला आहे.

या कथासंग्रहाच्या मनोगतामध्ये त्यांनी स्वतःच स्पष्ट केले आहे की, बालपण चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी या तालुक्याच्या ठिकाणी गेलेलं असल्याने तेथील समृद्ध अनुभव, संस्कार यांचा ठसा कथांवर उमटलेला आहे. तेथील वाडा संस्कृती, एकत्र कुटुंब पद्धती, जवळून वाहणारी वैनगंगा नदी, या कथा लेखनात स्वाभाविकपणे येतातच. त्या समृद्ध अनुभवातूनच 'नदी वाहते आहे' हा मानवी भावनांचा, इच्छा, वासनांचा एक प्रवाह वाचकांसमोर सादर करत आहे. भावना शेवटी नदीसारख्याच कधी अवखळ खळाळत्या तर कधी संथ वाहणाऱ्या, पण त्यांचं वाहन मात्र थांबत नाही. नदीच्या प्रवाहासारखं तेही अनंतच...

'नदी वाहते आहे' हा पहिलाच कथासंग्रह आहे तरीसुद्धा तो आश्वासक असाच आहे. त्यांच्या एकूण लेखनाविषयी डॉ. रवींद्र शोभणे यांनी खूप सुंदर असे निरीक्षण येथे मांडलेले आहे, ''मधुरा कथा मांडणी करताना थेट अनुभवांच्या आतल्या गाभ्याला जाऊन भिडते. अनुभवाला चितारतांना ती कुठेही आड पडदा ठेवत नाही. जे सांगायचे ते सांगून पूर्णपणे मोकळे होणे हा तिचा लेखनधर्म आहे. त्यामुळे तिची कथा आपल्या मनात वरवर रेंगाळत न राहता आतवर खोल रुतून बसते. तिच्या वाचनाचा संस्कार दीर्घकाळ मनावर कायम असतो. एकूण गुणवत्ता पडताळून पाहताना या कथा निश्चितच प्रामाणिक आहेत. त्यामुळे त्या अपेक्षा वाढविणाऱ्या आहेत.'' डॉक्टर शोभणे यांचे हे निरीक्षण केवळ मधुरा यांच्या कथेपुरतेच मर्यादित राहत नाही, तर कथालेखन करणाऱ्या सर्वच नवोदित व प्रस्थापित लेखकांना देखील ते मार्गदर्शक ठरावे असेच आहे.

खरोखरच 'नदी वाहते आहे' या कथांमधील एकूण अनुभव पाहता मधुराचे भविष्य नक्कीच आशादायक आहे, असा विश्वास वाटतो. शिरीष घाटे यांनी या कथासंग्रहाचे आशयाशी नाते सांगणारे मुखपृष्ठ साकारलेले आहे. ते पाहत असताना 'नदीष्ट' या कादंबरीची आठवण होते.


मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये

# ग्रंथपान

**स्मृतिगंध**

**श्रीमती गुणाबाई रा. गाडेकर यांचे आत्मचरित्र**

**संपादक : सुनीता सावरकर**




**हस्तलिखित स्वरूपातील दलित महिलेचे पहिले आत्मचरित्र.**

'माणसे जेवून गेली की हे असेच का? तू मध्ये का बोलली? असं म्हणून कधी प्रसाद मिळायचा. एखाद्या वेळी तू जेऊ नको, असे म्हणत. हे सर्व पाहून मला मोठी गंमत वाटायची. मनुष्य स्वभावाचा नमुना पाहावयास मिळाला. म्हणूनच एकीनं विहिरीत उडी टाकून जीव दिला व एक पळून गेली. मी ठरवलं काही झालं तरी दुसऱ्याला काही सांगायचं नाही. जे होईल ते सहन करायचं. कारण हे सगळं माहीत असतानाच मी यांना पत्करलं होते.'

शांताबाई कांबळे, ऊर्मिला पवार यांच्यासारख्या अनेक दलित महिलांची आत्मचरित्रे यापूर्वी प्रकाशित झालेली आहेत. अभ्यास करताना एक वेगळेच चळवळीचा भान आणि माणूसपणाचा भाग आपल्या लक्षात येतो. याच आत्मचरित्रांच्या जोडीने श्रीमती गुणाबाई गाडेकर यांचे चरित्र आता उपलब्ध झालेले आहे.

गुणाबाई गाडेकर या दलित समाजापैकी एक सुशिक्षित महिला आहेत. त्यांनी आपले शिक्षण पूर्ण करून आपल्या अस्तित्वाचा आणि आपल्या ध्येयाचा एक आलेख निर्माण केलेला आहे. दलितवर्गातील मुलांमुलींसाठी शाळा सुरू करणे, त्यांची राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून बोर्डिंग सुरू करणे, हे अतिशय अवघड असलेले काम. स्वातंत्र्यपूर्व काळात तर ते आणखीच बिकट होते. एखाद्या दलित महिलेने या कार्यासाठी झोकून द्यावे, त्यासाठी स्वतः ची पदरमोड करावी आणि त्यानंतर देणगीसाठी मदतीसाठी पुढे जावे, हे विशेष म्हणावे लागेल. गुणाबाई यांनी स्वतःचे शिक्षण सेवासदनामध्ये राहून पूर्ण केले. आपले शिक्षण पूर्ण करताना कोणत्या अडचणी येतात आणि त्यावर कशी मात करायची असते याचे बाळकडू त्यांनी त्याच काळात घेतलेले. त्यातून पेटलेले स्फुल्लिंग म्हणजे हे उभे राहिलेले शैक्षणिक कार्य होय. आर्थिक विषमता, सामाजिक विषमता यांच्यावर मात करून आपल्या समाजातील वर्गाला पुढे आणण्यासाठी जी चळवळ उभी राहावी लागते त्यात गुणाबाईंनी सक्रिय भाग घेतलेला आहे. म्हणूनच त्यांची ही वाटचाल थेट विधानसभेच्या आमदारपदाच्या निवडणुकीपर्यंत गेलेली आहे. खुद्द डॉक्टर बाबासाहेबांनी नागपूर येथे आयोजित केलेल्या समारंभाला गुणाबाईंना खास आमंत्रित करण्याचे सुचवले होते. इतकेच नाही तर या चरित्रामध्ये डॉ.बाबासाहेबांनी त्यांच्या विरोधात गुणाबाईंनी निवडणुकीला उभे राहू नये असेदेखील सुचवले होते, याचा संदर्भ यात येतो.

गुणाबाईंचा बालपणीचा काळ सुखवस्तू गेलेला असला तरी त्यांच्या वाट्याला आलेले आयुष्य निश्चितच खडतर होते. पहिल्या लग्नाची हळद धुऊन गेलेली नाही तोच त्यांच्यावर वैधव्याचा प्रहार झाला. दुसरे लग्न त्यांनी केले ते रामचंद्र गाडेकरांशी. गाडेकर हे सुशिक्षित होते, परंतु आर्थिक परिस्थितीने गांजलेले होते. त्यात भरीस भर म्हणजे त्यापूर्वी त्यांची दोन लग्ने झालेली होती. हे सगळे माहीत असूनही गुणाबाईंनी त्यांचा स्वीकार केला. यामागे त्यांची एक तात्त्विक बैठक आहे, 'श्रीमंत माणसाशी कोणीही लग्न करण्यास तयार होते. आपण अगदी गरीब; पण विद्वान निवडला पाहिजे. जी घराणे अंधारात आहेत त्यांना उजेडात आणले पाहिजे.'

गुणाबाईंचे चरित्र वाचत असताना असे लक्षात येते, की स्वातंत्र्यपूर्वकाळातील त्यांचे कर्तृत्व त्या काळात असलेल्या अनेक थोर जाणत्या कार्यकर्त्यांच्या मांदियाळीला समांतर आहे. विठ्ठल रामजी शिंदे, संत गाडगे महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मेहेरबाबा यांचा प्रत्यक्ष सहवास त्यांना लाभलेला आहे. याशिवाय अनेकांचे संदर्भ या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळतात.

सदरचे चरित्र प्रकाशात यावे यासाठी संपादक सुनीता सावरकर यांनी बरेच परिश्रम घेतलेले आहेत. इतकेच नाहीत तर संपादन करत असताना अनेक पातळ्यांवर त्यांना अभ्यास व संशोधन करून या चरित्राचे महत्त्व सिद्ध करावे लागले आहे. त्यांच्याच भाषेत सांगायचे झाले, तर 'हस्तलिखित स्वरूपात हे आत्मचरित्र दलित साहित्यातील एकूण आत्मचरित्रांच्या साहित्यात प्रथम ठरते. इतकेच नव्हे तर आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासाचे महत्त्वपूर्ण साधन, शिक्षण घेणाऱ्या अस्पृश्य स्त्रीच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील वाटचालीच्या अभ्यासाचे महत्त्वाचे साधन आणि ढोर – चांभार समाजातील स्त्रियांच्या व्यवसायातील सहभागाच्या संदर्भातील आतापर्यंत उपलब्ध झालेले आत्मचरित्र हे एकमेव संदर्भसाधन आहे.''

या आत्मचरित्राची भाषा अतिशय निरलस आणि मोकळेपणाने प्रवाह वाहत जावा अशी आहे. तरीही त्याला नेमकेपण आहे. आपल्या भोवती असणाऱ्यांचे वर्णन, यात सामाजिक कार्यकर्ते आणि कुटुंब असा कुठलाही भेद नाही. आत्मचरित्राला परिपूर्णता यावी म्हणून गुणाबाई यांचे चिरंजीव आणि कन्या यांच्या मनोगतांचा भाग सोबत जोडलेला आहे. याशिवाय आणखी काही परिशिष्टे जोडलेली आहेत, ज्यातून गुणाबाईंच्या चरित्राचा पूर्णपणे असा परिचय आपल्याला होतो. समाजकारण, राजकारण व आंबेडकरी चळवळीतील योगदान देणारी ही सर्वसाधारण घरातील पहिली चांभार स्त्री असल्यामुळे भावनिक व सामाजिक पातळीवर गुणाबाई गाडेकर या माझ्यासाठी आद्य नायिका आहेत, असे मत सुनीता सावरकर यांनी व्यक्त केले आहे.

सुनीता सावरकर या इतिहास या विषयातील पदव्युत्तर स्नातक असून 'दलित चळवळीतील वैचारिक मतभेदांचे सामाजिक व राजकीय परिणाम' या विषयात त्यांनी पीएचडी केलेली आहे. आंबेडकरवादी इतिहास लेखन, संशोधन; दलित, आदिवासी, ओबीसी व मराठा स्त्रियांचे इतिहासातील योगदान हा त्यांचा चिंतनाचा व संशोधनाचा भाग आहे.

पहिल्या आवृत्तीसाठी तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांची प्रस्तावना लाभलेली होती. त्याचप्रमाणे या आत्मचरित्राला सुनीता सावरकर यांनी लिहिलेली प्रस्तावनादेखील तितकीच प्रगल्भ आणि अभ्यासनीय आहे. समाजाला ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी स्वतःला झोकून देणाऱ्या गुणाबाईंचे हे आत्मचरित्र इतरांना नक्कीच प्रेरणादायी ठरेल. स्वातंत्र्यपूर्व व त्यानंतरचा सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय चळवळीचा इतिहासही अभ्यासकांसाठी साधन म्हणून नक्कीच उपयुक्त ठरेल, असा विश्वास आहे. शिरीष घाटे यांनी या आत्मचरित्राचे मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
MIDC
MAGNETIC MAHARASHTRA
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
अभिमान महाराष्ट्राचा, प्रेरणा भारताची
नवी भरारी औद्योगिक विकासाची !
आकर्षित गुंतवणूक
सामंजस्य करार- रू. ५.१२ लाख कोटी (जुलै २०२२ ते जुलै २०२४)
थेट परकीय गुंतवणूक- रू. २.४३ लाख कोटी (२०२२-२३, २०२३-२४)
नियमित गुंतवणूक- रू. ७० हजार कोटी (जुलै २०२२ ते जुलै २०२४)
रोजगार निर्मिती- सुमारे २.६ लाख (जुलै २०२२ ते जुलै २०२४)
नविन औद्योगिक उद्याने
इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर पुणे
पीएम मित्रा पार्क अमरावती
लेदर फुटवेअर पार्क रायगड
मँगो- कॅश्यु पार्क रत्नागिरी
बल्क ड्रग पार्क रायगड
इलेक्ट्रॉनिक्स अँड सेमीकंडक्टर
एरोस्पेस अँड डिफेन्स
ॲग्रो अँड फूड प्रोसेसिंग
इंडस्ट्री ४.०
टेक्सटाईल अँड टेक्निकल टेक्सटाईल
बल्क ड्रग अँड फार्मास्युटिकल
रिन्यूएबल एनर्जी अँड ग्रीन हायड्रोजन
लेदर, फुटवेअर अँड ॲक्सेसरीज
उदय सामंत
उद्योगमंत्री
www.midcindia.org
gmmarketing@midcindia.org
MIDC, Udyog Sarathi, Andheri (E), Mumbai - 93
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.